# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेली ग्रंथमाला




## अर्थस्य न्यायो दासः?

# या अंकात


| | | |
|---|---|---|
| 1. संपादकीय | | 03-05 |
| 2. पैशाने श्रीमंती येत नाही | दिवाकर मोहनी | 06-11 |
| 3. डाव्या चळवळीत धर्माचे स्थान | जॉन बोह्वर | 12- 15 |
| 4. देवाच्या नावावर राजकारण नको | सुसान जाकोबी | 16-19 |
| 5. अनुभव : मुलगी दत्तक घेताना | स्मिता पाटील | 20-24 |
| 6. पुस्तक परीक्षण : क्रिएटीव्ह पास्ट्व | नंदा खरे | 25-36 |
| 7. गोमांस : पाच प्रसंग | श्याम पाखरे | 37-39 |
| 8. चित्रपट-परीक्षण/ ॲज अग्ली ॲज इट गेट्व | उत्पल व. बा. | 4०-42 |
| 9. प्रतिसाद | कुमार नागे | 43-45 |
| 10. जाफर आणि मी | वर्जेश सोलंकी | 46-47 |
| 11. दस्तावेज | स्वामी विवेकानंद | 48 |



संस्थापक संपादक
**दि. य. देशपांडे**

संपादक
**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रकाशन – 3 जानेवारी 2016
प्रकाशकः भरत मोहनी, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.
मुद्रकः नितीन तापस, श्याम ब्रदर्स, एस.टी.स्टँड रोड, नागपूर-18.
किरकोळ प्रत – रु.30 फक्त



**संपर्कः**
रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ ravindrarp@gmail.com
भरत मोहनी bharat_i@yahoo.com (9822736808)
aajacha.sudharak@gmail.com


ही ग्रंथमाला संक्षिप्त स्वरूपात www.aajachasudharak.in वर प्रकाशित होते, संपूर्ण ग्रंथमाला मुद्रित पुस्तकाच्या स्वरूपात हवी असल्यास वर्षभरासाठी रु.300 व्यक्तीसाठी आणि रु.350 संस्थेसाठी पाठवून सभासद व्हावे. सभासद शुल्क मनीआर्डर अथवा पेयेबल अट पार चेक ने आजचा सुधारक, 201, श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर येथे पाठवावे.

# संपादकीय

धर्म आणि विवेकवाद ह्यातील नाते हा बहुधा ह्या शतकातील कळीचा मुद्दा असणार आहे. भारतातच नव्हे तर जगभरात धार्मिक मूलतत्त्ववाद दहशत-वादाच्या रूपाने डोके वर काढताना दिसत आहे. झेंड्यांच्या ह्या लढाईत कोणत्याही धर्माचे प्राणतत्त्व असणारी मूल्ये मात्र सर्रास पायदळी तुडवली जाताना दिसतात. भारतात दाभोलकर, पानसरे व कलबुर्गी ह्यांच्या झालेल्या हत्या, बांगलादेशमध्ये निरीश्वरवादी ब्लॉग लेखकांचे नेमाने पडणारे खून, मध्यपूर्वेत आयसीसने घातलेले थैमान व अमेरिकन राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्लामच्या नावाने तोडलेले तारे ह्या सर्व बाबी पराकोटीच्या धार्मिक असहिष्णुतेच्या निदर्शक आहेत. दुर्दैवाने 'रंगांधळ्या' मंडळीना फक्त अन्य धर्मांच्या व्यक्तींनी घातलेला हैदोस तेव्हढा दिसतो व 'आम्ही आहोतच सहिष्णु, ह्याहून मऊपणे वागलो तर 'ते' आमच्या डोक्यावर बसतील' असे युक्तिवाद मांडताना त्यांची सदसद्विवेकबुद्धी आड येत नाही, हे चित्रही सर्वत्र दिसते आहे.

पण ह्या काळोख्या भासणाऱ्या परिस्थितीला दुर्लक्षित रुपेरी किनारही आहे. ती आहे धर्मांच्या व्यापक, मुक्त व रचनात्मक पैलूची. आज जगभर सुरू असणारा संघर्ष मूठभर निरीश्वरवादी व धार्मिक रूढिवादी असा नाही. मुळात तो वेगवेगळ्या धर्मांत सुरू असणाऱ्या वैचारिक संघर्षाचा वैश्विक आविष्कार आहे. गेली काही दशके इस्लाममध्ये अरबस्थानातील मूलतत्त्ववाद व अन्य देशातील इस्लामचे खुले स्वरूप ह्यात रणकंदन सुरू आहे. सीरिया, तुर्कस्थान, अफगाणिस्थान ह्या देशांत स्त्रिया आताआतापर्यंत मोकळेपणाने वावरत असत. आता मूलतत्त्ववाद्यांच्या आक्रमकतेमुळे त्यांच्या हालचालीवर, शिक्षण घेण्यावर बंधने आली आहेत. भारतातही अनेक प्रांतांत व जाती-जमातींमध्ये हिजाबची प्रथा आतापर्यंत नव्हती, ती तब्लीगसारख्या संघटनांच्या दबावामुळे वेगाने पसरली आहे. असे असले तरी इंडोनेशिया, मलेशिया व इतर मुस्लिमबहुल देशात इस्लामचे स्थानिक व मोकळे रूप सनातन्यांशी नेटाने झुंजते आहे, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. ख्रिस्ती धर्मात तर विद्यमान पोप फ्रान्सिस द्वितीय ह्यांनी रोमन कॅथॉलिक चर्चच्या कर्णधारपदाची सूत्रे हाती

घेतल्या दिवसापासून ह्या लढाईचे रणशिंगच फुंकले आहे. गेल्या काही महिन्यांतील त्यांची वक्तव्ये पहिली तर हा माणूस चर्चचे पारंपरिक, कालविन्मुख स्वरूप नष्ट करून धर्माला एक नवा चेहरामोहरा देण्यासाठी कटिबद्ध झाला आहे असे लक्षात येते. त्यांनी चर्चने आतापर्यंत केलेल्या अनेक दुष्कृत्यांबद्दल संबंधितांची जाहीर माफी मागितली (उदा. आदिवासींचा संहार). काही धर्मोपदेशकानी बालकांवर केलेल्या लैंगिक अत्याचारासारखा नाजूक प्रश्न असो की युरोपातील निर्वासितांना आश्रय देण्याचा राजकीय सवाल असो, पोपनी त्या प्रश्नांवर घेतलेली भूमिका ही मानवतेला व ख्रिस्ती धर्माला अभिप्रेत असलेली करुणा व सच्चेपणा ह्यांच्याशी सुसंगत होती. अलीकडच्या काळात त्यांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नफेखोरीविरुद्ध, पहिल्या जगाने चालवलेल्या पर्यावरणनाशाविरुद्ध इतकी ठाम व सुस्पष्ट भूमिका घेतली की आपण अवाक् होतो. डोनाल्ड ट्रम्पसारखे राजकीय नेते इतके बहकल्यासारखे का वागू लागले आहेत, ह्या प्रश्नाचे उत्तर पोपच्या कार्यामुळे अशा मंडळीना वाटणाऱ्या असुरक्षिततेत दडले आहे.

ह्या अंकात आम्ही ह्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील डाव्या चळवळीत सुरू असणाऱ्या एका महत्त्वाच्या विषयावरील वादविवादाकडे आमच्या वाचकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. 'डाव्या चळवळीत धर्माला स्थान असावे का? ख्रिश्चनधर्मातील पोप फ्रान्सिससारख्या नेत्यांमुळे अवरुद्ध अवस्थेतील भांडवलशाहीविरोधी लढ्याला ऊर्जा व अवकाश प्राप्त होऊ शकेल का?' ह्या प्रश्नांवरील वाद-प्रतिवाद आम्ही आपल्यासमोर ठेवत आहोत. वैश्विक राजकारणातील अमेरिकेचे आजचे स्थान व सर्वच धर्मांत सुरू असलेली घुसळण लक्षात घेता ह्या चर्चेचे महत्त्व व प्रासंगिकता आपल्या ध्यानात येईल. त्याचबरोबर श्रीमंती नेमकी कशाने येते व भारतीय लोक तंत्रज्ञानात मागे का आहेत, अशा मूलभूत प्रश्नांचा वेध घेणाऱ्या दिवाकर मोहनी ह्यांच्या लेखाचा पूर्वार्ध या अंकात प्रकाशित करत आहोत. नंदा खरे 'मराठ्यांचा अस्मितादर्शी इतिहास' ह्या त्यांच्या आवडीच्या विषयावरील एका महत्त्वाच्या पुस्तकाचा परिचय त्यांच्या खास शैलीत करून देत आहेत. ह्या दोन्ही लेखांवर 'आ.सु.'च्या परंपरेला साजेशी चर्चा अपेक्षित आहे. त्याशिवाय मागच्या अंकापासून सुरू केलेली सदरे - चित्रपट परीक्षण, अनुभव, कविता आहेतच. त्याशिवाय 'दस्तावेज' नावाचे एक नवे सदरही सुरू करीत आहोत.

डिसेंबर २०१५च्या अंकाविषयी मिळालेल्या प्रतिक्रियांनी आमचा उत्साह खचितच वाढला आहे. 'आजचा सुधारक'चे विवेकवादी विचारपीठ हे 'स्व'रूप अबाधित ठेवून तो तरुण व अर्ध-नागरी वाचकसमुदायापर्यंत नेण्याची आमची आकांक्षा आहे, हे आम्ही मागच्या अंकात नमूद केले आहे. त्याशिवाय अनेक महत्त्वाच्या व माध्यमांकडून दुर्लक्षित (राहिलेल्या/केल्या गेलेल्या) विषयांवर व्यापक व सखोल चर्चा घडवून आणण्याचाही आमचा प्रयत्न राहील. त्यासाठी वाचक व संपादक ह्यांच्यात उत्तम संवाद होणे आवश्यक आहे.

कृपया editor.sudharak@gmail.com वर मेल पाठवून कळवा किंवा अंकात दिलेल्या पत्त्यावर पत्र पाठवा.

'आ. सु.'ला आपल्या भक्कम पाठबळाची गरज आहे. वर्गणीविषयक सविस्तर निवेदन अंकात देत आहोत. कृपया आपली वार्षिक वर्गणी लौकर भरावी.

**२०१५ साल बरेच अंधारलेले होते. नव्या वर्षी फटफटायला लागेल, अशी आशा आपण करू या.**

## अंक न मिळणे

आमचे अनेक वर्गणीदार अंक न मिळाल्याची तक्रार करतात. पोस्टाची सेवा बेभरवशाची झाली असल्यामुळे सर्वच नियत-कालिकांना हा प्रश्न भेडसावीत आहे.

कृपया अंक न मिळाल्याची तक्रार श्री. भरत मोहनी ह्यांच्याकडे aajacha.sudharak@gmail.com ह्या पत्त्यावर किंवा ९८२२७३६८०८ ह्या फोन क्रमांकावर करावी.

आपल्याला ईमेलने अंक लगेच पाठविण्यात येईल. पोस्टाने नवा अंक पाठविण्यास व तुमच्यापर्यंत पोहचण्यास उशीर लागेल, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

# पैशाने श्रीमंती येत नाही

*दिवाकर मोहनी*

श्रम, संपत्तिनिर्माण, तंत्रज्ञान

---

आपण बहुतेक वेळी संपत्तीचा संबंध पैशाशी लावतो. पण त्याचा संबंध तंत्रज्ञानाच्या वापरातून माणसाला मिळणाऱ्या फुरसतीशी आहे, अशी अभिनव मांडणी करणारा; भारतात तंत्रज्ञानातील नवसर्जन का घडत नाही, उत्पादन, चलनवाढ व उपभोग ह्यांचा परस्परसंबंध कसा असावा अशा महत्त्वाच्या प्रश्नांचा वेध घेणारा लेख

---

श्रीमंती पैशाने येत नाही. ती श्रम वाचवल्याने येते. येथे श्रम म्हणजे शरीरश्रम, बौद्धिक श्रम नव्हे. आपल्या सर्व गरजा भागवून ज्याला काही फुरसतीचा काळ मिळतो तो श्रीमंत. ज्याला आपल्या गरजा भागवण्यासाठी दिवसभर हातापायांचे श्रम करावे लागतात तो गरीब. एक गोष्ट सांगतो --

"एक शहरी माणूस एका खेड्यात गेला. ते खेडे एका नदीच्या काठावर वसले होते आणि त्यापासून थोड्याच अंतरावर सुंदर वनराई होती. हा शहरी एकदा त्या वनराईकडे फिरायला गेला असता त्याला तिथे एक गडीमाणूस एका झाडाखाली निवांत पहुडलेला दिसला. तो शहरी माणूस त्याला म्हणाला. "अरे! हे तू हे काय काय करत बसलास, कुठे काम कर, कुठे नोकरी कर, माझ्याकडे येशील तर मी तुला नोकरी देववतो, अन् तू छान आनंदात राहशील, तुला इतके पैसे मिळतील की त्यातले काही तू साठवू शकशील." हे सारे ऐकून तो खेडवळ म्हणाला – "पण पैसे साठवून मी काय करू?" त्याला शहरी माणसाने उत्तर दिले – "तू चांगला आराम करू शकशील!" त्यावर तो खेडवळ म्हणाला – "मला हे सर्व नको, मी तिकडे शहरात येत नाही. मी सध्या काय करतो आहे? आरामच तर करतो आहे." मला याप्रकारचा आराम अभिप्रेत नाही. कारण ह्या तऱ्हेचा आराम ज्याला मिळतो त्याची कामे दुसऱ्याला करावी लागतात. या गोष्टीतल्या खेडवळ माणसाने आपल्या गरजा कमी केल्या आहेत. ज्याने गरजा कमी केल्या आहेत, त्यापेक्षा ज्याच्या गरजा

पुष्कळ आहेत व त्या भागवून त्याला फुरसत मिळते तो खरा श्रीमंत असे मला म्हणावयाचे आहे.

शेतकरी शेतात मेहनत करीत असतानाच, गवंडी, सुतार, लोहार यांनी त्याचे घर बांधून दिले तर ती श्रमविभागणीच होय. माणसाच्या वाढत्या गरजा पूर्ण करून त्याला फुरसत होऊ लागली, ती दोन कारणांनी - त्याने श्रमविभागणी केली आणि दुसरे म्हणजे त्याने स्नायुबाह्य ऊर्जेचा वापर केला. स्नायुबाह्य ऊर्जेचा वापर केला तर रोजगारनिर्मिती थांबते, बेकारी वाढते असा सार्वत्रिक समज आहे. आणि या समजामुळे अशी ऊर्जा वापरायला नेहमी विरोध होत आला आहे. आपला असा समज आहे की याला रोजगार नाही अशा माणसाला उत्पन्न नसल्याने त्याच्या ठिकाणी क्रयशक्ती नसते व क्रयशक्ती नसल्यामुळे त्याच्या गरजा पूर्ण होत नाहीत; त्याच्या पदरी लाचारी येते. मला मात्र असे वाटत नाही. आमच्या लहानपणी नोकरी करणाऱ्यांची संख्या मुळातच कमी होती. आणि स्त्रिया तर क्वचितच कोणी नोकरी करणाऱ्या असत. असे असूनदेखील सर्वांचाच निर्वाह होत होता. आजसुद्धा कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांस वर्षातून जेमतेम सव्वाशे किंवा फारतर दीडशे दिवस काम असते. वर्षाच्या तीनशेपासष्ट दिवसांपैकी दोनशे दिवस तो मोकळाच असतो. याशिवाय अलिकडे अश्या पुष्कळ नोकऱ्या निर्माण झालेल्या आहेत की त्या नोकऱ्या करणारे लोक कामच करीत नाहीत. अशी अनेक महाविद्यालये आहेत जेथे मुले वर्गात बसत नाहीत. तेथे प्राध्यापक केवळ टिवल्या-बावल्या करतात  आणि महिनाअखेर रग्गड पगार घरी नेतात. काही सरकारी कचेऱ्यांतूनही असेच दृश्य आहे. त्यामुळे असा अर्थ निघतो की, काम केले नाही तरी सामान्य माणसाच्या गरजा भागतात.

हे सारे शक्य होते याचे कारण - माणसाच्या गरजा भागवण्यासाठी ज्या वस्तू लागतात त्यातल्या पुष्कळश्या, अन्न सोडून बाकी सगळ्या यंत्रांनी निर्माण होतात. आणखी एक गोष्ट ती अशी की, एकाच कामाचा मोबदला निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळा मिळतो. खाजगी नोकरीत कारकुनाला जितके पैसे मिळतात तितकेच किंवा त्यापेक्षा कमी काम करणाऱ्या कारकुनाला सरकारी नोकरीत पुष्कळ जास्त मिळतात. याशिवाय आरोग्यसेवा आणि निवृत्तिवेतन ह्याही बाबतींत फरक असतो. सरकारी नोकरीतही, राज्यसरकारची, केंद्रसरकारची आणि संरक्षणखात्याची असा फरक आहे आणि

त्या-त्या ठिकाणचे वेतनही वेगवेगळे आहे.

ज्या देशात जास्त सुबत्ता आहे तेथे त्याच प्रकारचे काम करणाऱ्याला आपल्यापेक्षा कितीतरी जास्त लाभ मिळतात. या सगळ्याचा अर्थ असा की, श्रमाचा आणि त्या श्रमापासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा काही संबंध नाही. जास्त श्रम केल्याने जास्त उत्पन्न आणि कमी श्रमाने कमी उत्पन्न असा भाग आता राहिलेला नाही.

जेथे उत्पन्न खूप पण उपभोग्य वस्तूंची वानवा तेथे त्या उत्पन्नाचा काहीही उपयोग नाही. जेथे ग्राहकाजवळ पैसा पुष्कळ आणि विकत घेण्यासाठी वस्तू कमी, तेथे वस्तू अतिशय महाग. अशा ठिकाणी जर वस्तूंच्या किंमतीवर निर्बंध घातले तर काळाबाजार फोफावेल. म्हणजे स्वस्ताई आणि महागाई जशी असेल त्याप्रमाणे ग्राहकाचा उपभोग कमी जास्त होतो. ही सारी आर्थिक व्यवहाराची एक बाजू झाली. आता दुसरी बाजू बघू या -- ती पाहताना आपण पैशाकडे दुर्लक्ष करू या. आणि मानवाच्या श्रमांचा मोबदला पैशात नव्हे तर वस्तूंमध्ये कसा मिळतो ते पाहू या! औद्योगिक क्रांतीनंतर यंत्रापासून निर्मिलेल्या वस्तू पैशाने नव्हे तर श्रमाच्या मोबदल्यात स्वस्त मिळतात. एखाद्या वस्तूच्या निर्मितीसाठी मानवी श्रम जितके कमी तितकी ती वस्तू स्वस्त. तिची पैशांत किंमत कितीही असली तरी. पुढे-पुढे अशी वस्तू फुकटच मिळते असे म्हणायला हरकत नाही. ज्यावेळी माणसाचे श्रम पूर्वीइतके, पण त्याचा उपभोग वाढलेला अशी स्थिती असते त्यावेळी आपण त्याचे राहणीमान वाढले असे म्हणतो. आपले राहणीमान वाढवत नेणे ही माणसाची सहजप्रवृत्ती असल्यामुळे तो दुसऱ्या माणसाकडून कामे करवून घेतो किंवा यंत्राकडून करवून घेतो. यंत्राकडून कामे करवून घेतल्याने सगळ्या मानवसमाजाचेच श्रम कमी होत असतात आणि ज्यावेळी सार्वजनिक संपत्ती वाढते त्यावेळीही सगळ्यांचे श्रम कमी होतात. एक-दोन उदाहरणे देतो –

रेल्वे ही सार्वजनिक संपत्ती आहे. रेल्वेच्या वापरामुळे किती लोकांची पायपीट वाचली आहे याचा हिशोब करा! रेल्वेला जो नफा होतो तो सार्वजनिक कामासाठीच वापरला जातो. पायपीट वाचवणारी सगळी साधने मग ती पैशाने कितीही महाग असोत, ती समाजाचे श्रम कमी करतात. म्हणजेच श्रीमंती वाढवीत असतात. वीज निर्माण करणारी साधने सार्वजनिक मालकीची असली तर ती माणसाचे वेगवेगळ्या कामाचे श्रम कमी करतात, इतकेच नव्हे तर

त्याची श्रीमंती भरमसाठ वाढवतात. वीज आज कोणते काम करीत नाही? ती आज गाड्या चालवते - म्हणजे पायपीट वाचवते. पाणी उपसते, वारा घालते, पाणी तापवते, थंड करते. हवा तापवते, थंड करते, उद्वाहनासारख्या साधनांनी चढण्या-उतरण्याचे श्रम वाचवते, हे सारे सार्वजनिक मालकीचे झाले तर नफा-तोट्याकडे न पाहता ती सर्वांच्या उपयोगी पडेल इतकेच नव्हे तर त्यायोगे सर्व जनतेत समानता येईल. या सेवा खाजगी मालकीच्या असतात तेव्हा त्यांच्यापासून नफ्याची अपेक्षा असते. आणि जोपर्यंत नफा मिळत राहावा यासाठी त्या सेवा वापरल्या जातात तोपर्यंत त्या सर्वांपर्यंत पोहचू शकत नाहीत आणि वंचितांची संख्या वाढत राहते. सार्वजनिक मालकीच्या बसगाड्या झाल्या म्हणून त्या खेड्यापाड्यापर्यंत पोहचू शकल्या. तसेच शाळांचे व पाठ्यपुस्तकांचेही आहे. शिक्षणावर सगळ्यांचा हक्क आहे असे सर्व समाजाला वाटले तेव्हा शाळेतील मुलांना गणवेश, पुस्तके, दुपारचे जेवण हे विनामूल्य मिळू लागले आणि शिक्षण खेड्यापाड्यापर्यंत पोहचू शकले. जोपर्यंत शाळा खाजगी होत्या तोपर्यंत केवळ धनिकांचीच मुले शिकू शकत होती. आता ज्यांच्याजवळ पैसा नाही त्यांचीही मुले शाळेत शिकू शकतात. याचा अर्थ असा होतो की, ह्याबाबतीत गरिबांचे राहणीमान पैशाशिवाय सुधारले आहे. सध्याचे जे खाजगीकरणाचे धोरण आहे त्यामुळे आपण विषमतेत भर घालत आहोत.

वरच्या सगळ्या विवेचनावरून हे लक्षात येईल की, आपले राहणीमान सुधारण्यासाठी पैशाचा फारसा उपयोग होत नाही. पैशाने विकत घेण्याजोग्या वस्तू बाजारात असल्याशिवाय पैशाचा काहीही उपयोग नाही. तुमच्याजवळ पुष्कळ धनसंपत्ती आहे पण बाजारात धान्यच नाही अशी स्थिती असेल तर त्या धनसंपत्तीचा काही उपयोग नाही. तुमच्या खिशात पुष्कळ पैसा आहे आणि तुम्हाला नदी ओलांडायची आहे अशावेळी तिथे नाव आणि नावाडी नसेल तर त्या पैशाचा कणमात्र उपयोग नाही. बाळंतीण अडली आहे अन् वाहन नाही, प्राण कंठाशी आले आहेत पण दुकानात औषध नाही अशी पुष्कळ उदाहरणे देता येतील. थोडक्यात काय तर पैशाने सगळे प्रश्न सुटतात हा भ्रम आहे.

उपभोग महत्त्वाचा आहे, पैसा नाही. असे असताना आपल्या देशात सर्वत्र धनाचा संचय करण्याचा आणि वाममार्गाने पैसा मिळवण्याचा प्रघात

पडला आहे. आज खरोखरी वाममार्गाने मिळवलेला पैसा, दडवलेला पैसा घरोघर दिसून येतो. पैसा दडवल्यामुळे बाजारात नाणेटंचाई होते आणि व्यापारव्यवहाराला अडचण येते. व्यवहार सुरळीत चालावा यासाठी सरकारला नवीन चलन बाजारात आणावे लागते. पैसा दडवणे आणि नवीन चलन आणणे हे चक्र सुरू झाले की ते थांबवणे फार अवघड होते. परिणाम असा होतो की, बाजारातल्या वस्तू तेवढ्याच राहतात आणि पैसा वाढत जातो. रस्त्यांवर खड्डे असतात ते दुरुस्त होत नाहीत, बसगाड्यांमध्ये अतोनात गर्दी होते, पैसा असूनही गैरसोयीला सामोरे जावे लागते. वाममार्गाने खिशात आलेला पैसा उजागरीने खर्चही करता येत नाही. त्यामुळे काळ्या पैशातले व्यवहार वाढत जातात आणि उपभोग जिथल्या-तिथेच राहतो.

आज आपल्या देशात सर्वत्र हेच चित्र दिसत आहे. आज आमचे बहुसंख्य नागिरक पैसा खायचा प्रयत्न करतात. हा त्यांच्याजवळचा पैसा फार क्वचित उत्पादनात वापरला जातो. कारण तो दडवलेला असतो. या पैशाने उत्पादन वाढत नाही, केवळ चलन वाढते.

काही लोक कोट्यवधी रुपये खातात किंवा अफरातफर करतात. हे आकडे ऐकून आपल्याला अचंबित व्हायला होते. आणि मनात त्यांचा हेवाही वाटतो. पण लक्षात घ्या की त्यांच्याजवळच्या पैशाने त्यांच्या उपभोगात रत्तीमात्र फरक पडत नाही. त्यांच्याजवळचा पैसा बहुधा पैसाच राहतो. त्या पैशाचे रूपांतर वस्तूत होत नाही. पैसा लपवण्याचे स्थान कोणते असे विचाराल तर स्वित्झरलँडमधील बँका हे त्याचे उत्तर आहे. अशा काळ्या पैशाचे रूपांतर होण्यासाठी एकतर तितक्या वस्तू बाजारात हव्या, नाहीतर फार मोठे धैर्य हवे. कोट्यवधी रुपयांच्या मोटारी कोण्या एकाने अलिकडेच विकत घेतल्याची बातमी ऐकायला मिळाली. त्याला सगळ्या गाड्या आपल्या नावावर घेता आल्या नाहीत ही एक गोष्ट आणि त्याने केलेल्या पैशाचा अपहार लोकांच्या लक्षात आल्याबरोबर इतक्या गाड्या स्वतः घेणाऱ्या व्यक्तीला फरार व्हावे लागले! येथे अशा भ्रष्टाचार करून घेतलेल्या वस्तू त्याला वापरता आल्या नाहीत हे लक्षात आणून द्यावयाचे आहे. सगळ्या गाड्यांचा उपभोग काही त्याच्या वाट्याला येत नाही. जरी सगळ्या गाड्या त्याच्याजवळ असल्या तरी तो एका वेळी एकाच गाडीचा उपभोग घेऊ शकेल, सगळ्या नाही. लक्षात घ्या, गेल्या काही वर्षांत घरोघर टी.व्ही.झाले आहेत. मोबाइल ज्याला सेलफोन

म्हणतात तोही सगळ्यांच्या जवळ जाऊन पोहोचला आहे. घरात वापरण्याची विजेवर चालणारी उपकरणे सगळ्या मध्यमवर्गीयांच्या घरात पोहोचली आहेत. काही मध्यमवर्गीयांच्या जवळ दोन-दोन घरे आहेत. एक मुंबईला, दुसरे पुण्याला. मुंबईला राहणारे मध्यमवर्गीय सेवानिवृत्त होण्याच्या सुमारास पुण्याला घर घेतात. काही दिवस तिथे, काही दिवस इथे असे राहतात. ही सुबत्ता पन्नास वर्षांपूर्वी त्यांच्या स्वप्नातही आली नव्हती. ही जी सार्वत्रिक सुबत्ता आज दिसते ती प्राप्त करण्यासाठी कोणीही अंगाबाहेर मेहनत केली असेल असे दिसत नाही. मग हे कसे घडले हे आता पाहू.

समजा एक शाळेतला शिक्षक आहे. तो त्याचे काम करतो. दुसरीकडे यंत्रज्ञ किंवा कामगार वेगवेगळ्या कारखान्यात काम करतात. कोणी मोटारगाड्यांच्या कारखान्यात काम करतो तर कोणी सिमेंट बनवण्याच्या. दोघेही दिवसाचे आठ तास काम करतात. त्यांच्या श्रमातून एकीकडे विद्यार्थी घडत असतात आणि दुसरीकडे मोटारगाड्या. मोटारी घडवणारे जे कारखाने असतात त्यांची रचना अशी असते की, वर्षाला एक पाच-दहा हजार गाड्या त्यांच्या कारखान्यातून बाहेर पडल्याशिवाय तो कारखाना स्वयंपूर्ण होऊ शकणार नाही. आणि असे शेकडो कारखाने आपल्या देशात आहेत. ते दुचाकी, तीनचाकी, आणि चारचाकी गाड्या भराभर तयार करीत आहेत. ही वाहने इतकी तयार होतात की ठेवायलाही जागा नसते. त्यांना ती देश-विदेशात विकावीच लागतात; आणि ती वापरणाऱ्यांची संख्या त्यामुळे भराभर वाढली आहे. याचा अर्थ असा होतो की, एखाद्या वस्तूचे उत्पादन सतत होत राहिले तर उपभोक्त्यांच्या संख्येत त्याच प्रमाणात वाढ होते. उपभोक्त्याला कोणतीही अधिक मेहनत न करता अशा वस्तूंचा लाभ होतो. वरील उदाहरण फक्त मोटारगाड्यांनाच किंवा स्कूटरलाच लागू नाही तर सगळ्याच उपभोग्य वस्तूंना लागू आहे. आज आपल्या देशात कपडा इतका तयार होतो की, त्यासाठी दुकानातील जागा अपुरी पडते. चौका-चौकात कपड्यांचे ढीग विक्रीसाठी उपलब्ध असतात.

(क्रमशः)

*श्रीमोहिनीराज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 440010.*

# डाव्या चळवळीत धर्माचे स्थान

*जॉन बोव्हर (अनुवाद : सुकल्प कारंजेकर)*

ख्रिश्चन धर्म, डावा विचार, समाजपरिवर्तन, भांडवलशाही

---

सध्याचे दिवस धर्माला अफूची गोळी मानून त्याच्यापासून दूर राहण्याचे नाहीत. ख्रिश्चन धर्माची मूलतत्त्वे डाव्या विचारांच्या खूप जवळची आहेत. त्याचे नाते भांडवलशाहीशी जोडणे ही धनदांडग्यांची चलाखी आहे. धर्मातील पुरोगामी प्रवाहाशी नाते जोडले तर डाव्या चळवळींना अमेरिकन राजकारणातील कोंडी फोडता येईल असे प्रतिपादन करणारा लेख.

---

गेल्या काही दशकांत अमेरिकेत झडलेल्या सांस्कृतिक वादविवादांमध्ये तसेच दैनंदिन जीवनाच्या विविध अंगांवर धर्माचा पगडा स्पष्टपणे दिसून येतो. त्याच्या अनुषंगाने अनेक प्रश्न पुढे आले आहेत. उदा.; सरकारी शाळांमध्ये धार्मिक प्रार्थना सक्तीची केली जाईल का? शाळांमध्ये उत्क्रांतीच्या सिद्धान्ताऐवजी बायबलप्रणीत निर्मिती (क्रिएशन)चा धडा शिकविला जाईल? शाळांमधून अमेरिकन ध्वजाला विधिपूर्वक नमन सक्तीचे केले जाईल? दूरचित्रवाणीवर लैंगिक समस्या, गर्भपात, समलैंगिकता, तसेच चाकोरीबाहेरील परिवार दाखविले जातील? बहुसंख्य अमेरिकन लोक, भविष्याचे कोणते स्वप्न पाहतील- धर्मनिरपेक्ष, पुरोगामी चौकटीतले की गतकालीन ख्रिश्चन धर्माच्या सुवर्णकाळाचे? अमेरिकेतील अद्यापही न संपलेल्या ह्या सांस्कृतिक संघर्षाचे चित्र जसजसे स्पष्ट होत जाते, तसे आपल्या लक्षात येऊ लागते की धर्माची अर्थउकल हादेखील ह्या संघर्षात महत्त्वाचा मुद्दा होता.

इतिहासकार केविन क्रूस ह्यांनी देवसत्तेखालील राष्ट्र - भांडवलशाही प्रेरित ख्रिश्चन अमेरिका (One Nation Under God - How Corporate America Invented Christian America) ह्या पुस्तकात असा विचार मांडला आहे की भांडवलशाही ही ख्रिश्चन धर्माच्या मूलतत्त्वांना पूरक आहे हा प्रचार अमेरिकन उजव्या गटांच्या धोरणाचा एक

भाग होता. हा विचार पसरवण्यामागे ह्या गटांचे स्वार्थ होते आणि त्याचा परिपाक उजव्या आधुनिक ख्रिश्चन राजकारणात झाला. परंतु, ख्रिश्चन भांडवलशाही ही ख्रिश्चन धर्माच्या राजकारणाची अपरिहार्य परिणती आहे असे मानणे हा ख्रिस्ती धर्म व डावी विचारसरणी दोघांचाही अपमान करण्यासारखे आहे. मुळात ख्रिश्चन धर्माची मूलतत्त्वे डाव्या विचारसरणीच्या मूलतत्त्वांच्या संपूर्ण विरोधात आहे असे समजणे ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचे ठरेल. १९३० च्या दशकात आलेल्या आर्थिक महामंदीनंतर भांडवलशाहीला ख्रिश्चन धर्माच्या विचारसरणीवर प्रभुत्व मिळविण्यात यश मिळाले. परंतु अमेरिकेतील ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांनी प्रशासन किंवा समाज ह्यांवरील भांडवलशाहीचा पगडा कधीही मान्य केला नव्हता. इतिहासकार हीद् कार्टर (Heath Carter) ह्यांच्या Union Made: Working People and the Rise of Social Christianity in Chicago ह्या अभ्यासातून असे लक्षात येते की, न्याय व श्रमप्रतिष्ठा ह्या मुद्द्यांवर कामगारांना संघटित करताना डाव्या कार्यकर्त्यांना ख्रिश्चन धर्मातील तत्त्वांचा बराच उपयोग करता आला. अमेरिकेतील कामगार चळवळीला ख्रिश्चन धर्मातील सर्व पंथांची सहानुभूती लाभली हा इतिहास आहे.

कामगारसंघटनांच्या वर्तुळाबाहेरील अन्य डाव्या सामाजिक चळवळींवर-देखील ख्रिश्चन धर्मशास्त्राचा प्रभाव होता. त्यात ब्लॅक पॉवर (Black Power) या कृष्णवर्णीयांच्या चळवळीचा तसेच मुक्तीचे धर्मशास्त्र (Liberation Theology) ह्या दक्षिण अमेरिकेतील चर्चप्रणीत चळवळीचा समावेश होतो. अमेरिकन असहकार चळवळीचे प्रणेते मार्टिन ल्यूथर किंग यांनी मुक्तीच्या धर्मशास्त्राचे हे तत्त्वज्ञान लोकांना वांशिक न्याय, सामाजिक तसेच आर्थिक समानता ह्यांच्या बाजूने लढ्यात उतरविण्यासाठी प्रभावीपणे वापरले. आज पोप फ्रान्सिस यांच्या वक्तृत्वात आणि लिखाणात प्रामुख्याने हाच विचार दिसून येतो. पोप फ्रान्सिस ह्यांनी त्याची पर्यावरणरक्षणाशी सांगड घालण्याचाही प्रयत्न केला आहे, ज्यामुळे समानतेच्या चळवळीला बळ मिळेल असा त्यांचा विश्वास आहे.

या घटनांवरून एक गोष्ट लक्षात येते की ख्रिश्चन धर्म हा इतर कोणत्याही विचारसरणीपेक्षा मुक्त बाजारपेठ व अनिर्बंध भांडवलशाही यांना अधिक अनुकूल आहे असे समजणे चुकीचे ठरेल. ख्रिश्चन धर्माला गरिबांच्या

समस्यांविषयी नेहमीच सहानुभूती वाटत आली आहे. ख्रिश्चन धर्म अमेरिकेतील पुराणमतवादी विचारांशी जोडले जाणे हा ऐतिहासिक अपघात नसून त्यामागे धनदांडग्यांनी आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न होते हेही आपल्या लक्षात येते. अर्थात ख्रिश्चन धर्म पूर्णपणे धर्मनिरपेक्ष डाव्या विचारांकडे झुकला आहे असे मानणेही चुकीचे ठरेल. कुटुंबसंस्था, लैंगिक प्रश्न, कुटुंबनियोजन ह्यांसारख्या सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत डावी चळवळ आणि ख्रिश्चन धर्म ह्यांच्या मांडणीत नेहमीच तणाव राहणार आहे. पुराणमतवादी डाव्या विचारांचे अनुयायी आणि धर्मनिरपेक्ष डाव्या विचारांचे अनुयायी ह्यांत अशा प्रश्नांवर मतभेद आहेत. तसे असले तरीही ख्रिश्चन धर्माचे समर्थन डाव्या चळवळीला कायम राहणे हे दोन कारणांसाठी महत्त्वाचे आहे. त्यातील पहिले कारण ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांचे संख्याबळ हे आहे. जगभरात जवळपास २०० कोटी लोक ख्रिश्चन धर्माचे पालन करतात. डाव्या चळवळीला मोठ्या संख्याबळाचे समर्थन मिळवायचे असेल तर त्यांना ह्या धर्माची सहानुभूती मिळवणे अपरिहार्य आहे. दुसरा भाग असा की सध्याच्या अनिर्बंध बाजारपेठेच्या युगात मालमत्ता, गरिबी व सरकारी धोरण ह्या मुद्यांवर नव-उदारमतवादी मतांच्या वरचष्म्याला आह्वान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ख्रिश्चन धर्म करू शकतो.

ह्याचे उदाहरण म्हणजे पोप फ्रान्सिस यांनी वाढत्या पर्यावरणीय संकटाला उद्देशून काढलेले लोडेतो सी (Laudeto Si) हे पत्रक. ह्या पत्रकातून पोप फ्रान्सिस ह्यांनी असा विचार मांडला आहे की 'सार्वजनिक वापरासाठी, समाजातील सर्वांच्या भल्यासाठी, वैयत्तिक मालमत्तेचाही त्याग करणे हे सकल नैतिक व सामाजिक रचनेचे मूल तत्त्व आहे.' पुढे त्यांनी असे नमूद केले आहे की 'ख्रिश्चन धर्माच्या शिकवणीनुसार व्यक्तीचा वैयत्तिक मालमत्तेवरील अधिकार हा केव्हाही अपरिवर्तनीय व निखालस नव्हता, उलट सर्व प्रकारच्या खाजगी मालमत्तेला सामाजिक उपयुक्ततेच्या परिघातच अर्थ मिळतो.' पोपचे हे विधान ख्रिश्चन धर्मशास्त्राच्या ऐतिहासिक परंपरेला साजेसे आहे. अगदी सुरुवातीच्या काळापासून ख्रिश्चन धर्मातील विचारवंतांनी आपल्या लिखाणांतून असे स्पष्ट केले होते की जमिनीचा मालकीहक्क हा संपूर्ण समाजाच्या विकासाला पूरक असला पाहिजे, केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी नाही. पोप फ्रान्सिस द्वितीय ह्यांच्यानुसार वैयक्तिक मालमत्ता हे समाजाचे ऋण असून समाजाच्या

जमिनीला जो वैयत्तिक स्वार्थासाठी वापरतो तो अशा वापरासाठी समाजाचे देणे लागतो.

ह्या तत्त्वांचा ख्रिश्चन राजकारणावर व्यापक व सखोल परिणाम होऊ शकेल. कारण उदारमतवादी राजकारणाचे अस्तित्व हे वैयक्तिक मालमत्तेच्या अभंगत्वावर व व्यक्तीने स्वतःला मत्ता समजण्यावर अवलंबून आहे. अमेरिकेच्या उदारमतवादी राजकारणात वैयक्तिक मालमत्तेचा अनादर करणे ही एक अत्यंत अवघड गोष्ट आहे. साहजिकच अमेरिकन राजकारणात सामाजिक गरज आणि वैयक्तिक गरज ह्यांची सांगड घालणे हा एक बिकट प्रश्न बनला आहे. व्यक्तिगत संपत्तीवरील टीका कितीही आवश्यक असली तरी अशा वातावरणात ती शक्यतो टाळली जाते.

परंतु उदारमतवादी राजकारणाच्या उदयापूर्वीच्या काळापासून ख्रिश्चन धर्मात अश्या टीकेची परंपरा आढळून येते. ह्याच परंपरेनुसार पोप फ्रान्सिस हे उदारमतवादी वैयत्तिक मालमत्तेच्या धोरणावर टीका करू शकतात. भांडवलशाहीप्रेमी पुराणमतवादी लोकांना मात्र हे पचवणे अवघड जाईल. त्यातल्या काहींना तर सामाजिक योजनांसाठी लावलेला करही ही वैयक्तिक मालमत्तेची चोरी आहे, म्हणून तो अनैतिक आहे असे वाटते.

ख्रिश्चन धर्म हा आजही अमेरिकेत व अमेरिकेच्या बाहेर करोडो लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे ख्रिश्चन धर्माने व्यक्तिगत मालकी-हक्कावर केलेल्या समीक्षेला त्यांच्या दृष्टीने खूप महत्त्व आहे, कारण तो त्यांच्या जीवनमूल्यांचा व त्यांना अभिप्रेत असलेल्या सत्याचा भाग आहे. यावरून असे लक्षात येते की ख्रिश्चन धर्माची तत्त्वे ही डाव्या राजकीय कृतीसाठी कार्यक्रम पुरवू शकतात. त्याचप्रमाणे कोणत्याही शोषण-विरोधी लढ्याला आवश्यक असणारी असणारी ऊर्जाही त्यातून मिळू शकते. ख्रिश्चन धर्माचा हा पुरोगामी वारसा हा आजच्या डाव्या चळवळीने लढा देऊन मिळविलाच पाहिजे.

*('Dissent' नियतकालिकाच्या Arguments on the Left विशेषांकातून साभार अनुवादित)*

ईमेल: sukalp.karanjekar@gmail.com

# देवाच्या नावावर राजकारण नको

*सुसान जाकोबी*

ख्रिश्चन धर्म, डावा विचार, समाजपरिवर्तन, भांडवलशाही

----------------------------------------------------------------------

अमेरिकेत डाव्यांनी उदारमतवादी धर्मांच्या बाजूचे राजकारण करावे असे सुचविणाऱ्या मताचा प्रतिवाद करणारी ही मांडणी

----------------------------------------------------------------------

दोन हजार तेरा सालची गोष्ट. टेक्सास राज्यात गर्भपाताची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर कमी करण्यासाठी विधिमंडळात मांडण्यात आलेल्या एका विधेयकावर चर्चा सुरू होती. (ते विधेयक नंतर संमतही झाले.) त्या चर्चेत भाग घेताना सिनेटर डॅन पॅट्रिक अन्य सदस्यांना उद्देशून म्हणाले – "जर तुम्ही ईश्वराला मानता, तर देव इथे असता तर त्याने कोणाच्या बाजूने मत दिले असते ह्याचा विचार करा."

हेच महाशय नंतर (देवाच्या कृपेने नव्हे, तर मानवी निवडणुकीच्या माध्यमातून) लेफ्टनंट गव्हर्नरपदी निवडले गेले. तेव्हा (९/११ च्या घटनेची याद जागवत) ते म्हणाले - "संकटसमयी देवाचा धावा करायचा व गर्भपाताचा प्रश्न आला की म्हणायचे - देवा, माफ कर, ह्या बाबतीत आम्ही विरुद्ध बाजूला आहोत, हा तर सरळ सरळ दांभिकपणा झाला."

अनेक राजकीय विश्लेषकांना हा विनोद वाटला असला, तरी तो विनोद नव्हे. किंबहुना, कोणत्याही ऐहिक राजकीय बाबीच्या निर्णयांत धर्माचा वापर केला की काय घडते, ह्याचे ते बोलके उदाहरण आहे. ज्या क्षणी एखादा राजकारणी देवाच्या वतीने बोलायला लागतो, तेव्हा त्याचा उद्देश लोकशाही मार्गाने चर्चा पुढे नेण्याचा खचितच नसतो, तर त्या चर्चेला तिथेच संपुष्टात आणण्याचा असतो. ईश्वर असे म्हणाला, बात खतम!

धर्म न मानणाऱ्या नागरिकांप्रमाणेच तो मानणाऱ्या नागरिकांना धोरणविषयक चर्चेत आपापली मते मांडण्याचा निश्चितच हक्क आहे. जेव्हा ते आपल्या श्रद्धांचे प्रदर्शन करण्याऐवजी त्या प्रत्यक्ष जगण्यातून व्यक्त करतात, तेव्हा लोकमत आपल्या बाजूने वळविण्यात ते नक्कीच यशस्वी ठरतात. उदा., चार्ल्सटन चर्चमध्ये एका गोऱ्या माथेफिरूने काळ्या उपासकांची कत्तल केली. तेव्हा, ख्रिस्ताच्या वचनांना स्मरून त्यांच्या कुटुंबीयांनी त्याला क्षमा केली . ह्या घटनेचा खोल ठसा सर्व देशावर उमटला.

परंतु, जेव्हा भाविक मंडळी आपल्या कल्पना ह्या वैश्विक नैतिकतेचा भाग असून त्या धर्म मानणाऱ्या - न मानणाऱ्या अशा सर्वांनी निमूटपणे स्वीकारल्याच पाहिजेत, असा आग्रह धरतात, तेव्हा तो लोकशाहीच्या मुळावर येणारा असल्याने त्याज्यच मानला पाहिजे. उदा. वर उल्लेखलेली क्षमाशीलता काही नागरिकांना नैतिकदृष्ट्या कितीही भावली, तरी फौजदारी कायद्यात तिला स्थान नाही. त्याउलट, कोणी धार्मिक ग्रंथांचा हवाला देऊन 'खून का बदला खून' म्हटल्याने देहान्ताच्या शिक्षेचे आज समर्थन करता येणार नाही.

मी जर सार्वजनिक शाळांमध्ये जाऊन निरीश्वरवादावर मुलांसमोर भाषणे करू लागलो, तर त्या विद्यार्थ्यांचे श्रद्धावान आईबाप संतापणे स्वाभाविकच आहे, कारण आपल्या बहुविध समाजात माझे विचार मुलांवर लादण्याचा मला हक्क नाही. पण लुइशियाना राज्यात मात्र रिपब्लिक गव्हर्नर बॉबी जिंदाल ह्यांच्या कृपेने विद्यार्थ्यांना उत्क्रांतीच्या शास्त्रीय सिद्धान्ताचा पर्याय म्हणून बायबलमधील 'ईश्वरप्रणीत रचनेचे' मिथक शिकविले जाते, आणि निधर्मी किंवा इहवादी पालकांना त्याबद्दल काहीही करता येत नाही.

धर्म आणि सरकार ह्यांच्या परस्परसंबंधांवर आधारित कितीतरी मुद्दे आहेत, उदा. गर्भपाताचा अधिकार आणि समलिंगी संबंधाना मान्यता. त्याशिवाय धार्मिक अजेंडा असणाऱ्या शाळांना सरकारने आर्थिक साह्य करावे का, असे अनेक मुद्दे आहेत, ज्यांवर धार्मिक रूढिवाद्यांचेही एकमत नाही. पण गम्मत ही आहे की (अमेरिकेसारख्या देशात) राज्यसंस्था आणि चर्चेस ह्यांच्यात अंतर असायला हवे ह्या साध्या मूलभूत बाबीवर एकमत होऊ शकत नाही. कारण तसे होऊ नये म्हणून ज्यू, कॅथोलिक व प्रोटेस्टंट ह्या तिन्ही पंथातील पुराणमतवाद्यांची अभेद्य युती कार्यरत असते.

हे कमी की काय म्हणून आता उदारमतवादी मंडळींपैकी काही

सार्वजनिक धोरणे ठरविताना धर्माचा आसरा घ्यावा ह्या मताला बळी पडताना दिसत आहेत. वेतनातील भेदभावाविरुद्ध लढताना आपण धर्माच्या उदारमतवादी अर्थनियमनाचा आसरा घ्यावा, आर्थिक भेदभाव हा देवाच्या आदेशाविरुद्ध आहे अशी भूमिका आपण घ्यावी असे ते सुचवितात. परंतु, बायबलमधील वचनांचा अर्थ उजव्या मंडळींनी आधीच आपल्याला अनुकूल असा लावून घेतल्यामुळे ईश्वरही अखेर आपल्या भक्तांनाच साथ देणार हे स्पष्ट आहे.

धर्माविषयी प्राथमिक ज्ञान असणाऱ्या कोणालाही हे नाकारता येणार नाही की जगातील तिन्ही महत्त्वाच्या एकेश्वरवादी धर्मांनी गुलामगिरीचे दीर्घकाळ समर्थन केले. क्वेकरपंथासारखे उदारमतवादी अपवाद वगळले, तर उत्तर अमेरिकेतील बहुसंख्य धार्मिक संस्थांनी सिव्हिल वॉरच्या समाप्तीपर्यंत त्यांच्या दक्षिण अमेरिकेतील गुलामगिरीसमर्थक सह-धर्मीयांचेच समर्थन केले होते. अमेरिकेतील गुलामगिरीची प्रथा मोडून काढण्याचे कार्य धर्माने नव्हे, तर अमेरिकन सैन्याने पार पाडले. त्यानंतरही सुमारे शंभर वर्षे ती प्रथा मानवतेच्या विरोधात असल्याचा ईश्वरी साक्षात्कार ह्या धार्मिक संस्थांना झाला नाही.

अमेरिकन क्रांतीसाठी लढणाऱ्या वीर पुरुषांबद्दल मला आदर आहे, भक्तिभाव नाही. जॉन ॲडॅम्स व थॉमस जेफरसनसारख्या नेत्यांनी इतक्या प्रकारची विधाने केली आहेत की त्यातून हवा तो अर्थ काढणे कोणालाही शक्य आहे. कारण इतर कोणत्याही मनुष्याप्राण्याप्रमाणे त्यांच्यातही अंतर्विरोध होते, हे निर्विवाद!

परंतु एक गोष्ट मात्र निश्चित आहे. (जस्टिस स्केलियांच्या शब्दांत सांगायचे तर) अमेरिकन घटनेच्या निर्मात्यांना 'ख्रिश्चन देशाची' किंबहुना धर्माधारित राज्याची निर्मिती नक्कीच करायची नव्हती. त्यांना तसे करायचे असते तर त्यांनी घटनेत तसा उल्लेख नक्की केला असता. ह्या देशाच्या मूलभूत न्याय चौकटीत ईश्वराला कोठेही स्थान दिलेले नाही. त्यामुळे धर्माच्या नावाने राजकारण करू पाहणाऱ्यांची  मोठीच गोची होऊन बसली आहे. त्यामुळेच १९व्या शतकात ह्या विचारांच्या समर्थकांनी 'ख्रिश्चन घटनादुरुस्ती' करण्याचा अयशस्वी प्रयत्न एकदा नाही, तर अनेकदा केला होता.

अमेरिकन घटनेच्या निर्मात्यांच्या व्यक्तिगत किंवा सामूहिक उणिवा काहीही असोत, मानवी समस्यांची  उत्तरे मानवी कृतीतूनच शोधली पाहिजेत,

हे साधेसरळ सत्य त्यांना उमगले होते. लोकशाही व्यवस्थेत नैतिकतेचा प्रश्न जिथे कुठे येतो तिथे, म्हणजे धोरणविषयक प्रत्येक वादात, धर्माला ओलांडून राजकीय मतैक्य घडवावे लागते. तेव्हा कोणाच्या तरी भावना दुखविण्याला पर्याय नसतो. धर्म आणि नैतिकता एकच आहेत असे मानणे ही इहवादी शासनावर विश्वास नसणाऱ्या मंडळींची घोडचूकच नव्हे, तर तो त्यांचा तद्दन खोटारडेपणा आहे.

राजकारण व नैतिक प्रश्नाची जेव्हा सरमिसळ केली जाते (युद्ध आणि वर्णभेद ही उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत), तेव्हा स्वतंत्र जगातील विविध धर्मांच्या अनुयायांना कोणत्या आधारावर निर्णय घ्यावा हे ठरविता येत नाही.

स्वातंत्र्याचा उद्घोष करण्यापूर्वी अब्राहम लिंकनदेखील ह्याच पेचात सापडला होता. “आम्ही परमात्म्याच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करतो” असे म्हणणारे धार्मिक नेते त्याला परस्परविरोधी सल्ला देत होते. तेव्हा तो म्हणाला, “परमेश्वराची काय इच्छा आहे हे समजून घ्यायला मलाही आवडेल. पण ह्या काळात चमत्कार घडत नाहीत आणि मला परमेश्वराचा प्रत्यक्ष साक्षात्कार होऊन तो मला त्याची मनीषा बोलून दाखवेल, अशी अपेक्षा माझ्याकडून आपण करणार नाहीत, असे मला वाटते. माझ्यासमोर येणाऱ्या प्रत्येक प्रकरणातील भौतिक तथ्ये मला अभ्यासावी लागतील, त्या प्रसंगी काय करणे शक्य, योग्य व शहाणपणाचे आहे ह्या आधारावरच मला निर्णय घ्यावा लागेल.”

सध्याच्या काळातही चमत्कार घडत नाहीत. अमेरिकन राजकारण्यांनी जर पृथ्वीवरील त्यांच्या कृत्यांची जबाबदारी घेतली आणि पारलौकिकातून त्यांची उत्तरे शोधण्याचे नाटक बंद केले तर तोच एक मोठा चमत्कार असेल, असे म्हणायला हरकत नाही.

*('Dissent' नियतकालिकाच्या Arguments on the Left विशेषांकातून साभार अनुवादित)*

* * *

# अनुभव : मुलगी दत्तक घेताना

*स्मिता पाटील*

दत्तक, स्त्री-पुरुष भेदभाव

----------------------------------------------------------------------

एकविसाव्या शतकात मुलगी दत्तक घेण्याच्या एका जोडप्याच्या निर्णयावर सुशिक्षित समाजाकडून मिळालेला प्रतिसाद, आपल्याला अंतर्मुख करणारा

----------------------------------------------------------------------

गाथा तिच्या घरी आली त्याला आता पुढच्या महिन्यात (ऑगस्टला) तीन वर्ष होतील. तेव्हा ती एक वर्षाची होती. या तीन वर्षांत आनंदाच्या अगणित क्षणांनी आमची ओंजळ भरलीये तिनं ! मूल दत्तक घ्यायचा निर्णय मी लग्नाआधीच - व्या वर्षी घेतला होता चतुरंगमधल्या एका लेखामुळे. लग्न ठरवताना मी माझ्या होणाऱ्या नवऱ्याला, अनिलला सांगितलं तेव्हा त्यालाही हा निर्णय आवडला. लग्न झाल्यावर आम्हाला जे मूल होईल त्याच्या अपोझीट सेक्सचं मूल दत्तक घ्यावं असं मला वाटलं. मात्र पत्रकारितेच्या सगळ्या हेक्टिक शेड्यूलमुळे नंतर माझी तीन अबोर्शन्स झाली. मूल व्हावं म्हणून कुठलीही ट्रीटमेंट घ्यायची नाही अशा विचारानंतर दत्तकप्रक्रियेला आम्ही सुरुवात केली. कागदपत्रांची पूर्तता करता करता जीव रडकुंडीला आला होता नुसता! त्यानंतर वेटिंग पिरीयड तब्बल अडीच वर्षे होता. दर वेळेस फोनाफोनी आणि निराशा. मला होणारा त्रास नवऱ्याला पाहवेना म्हणून त्याने दुसरीकडे चौकशी सुरू केली असताना त्याला एकानी सांगितलं की दोन - तीन लाख रु. देणार असाल तर बाळ लगेच मिळेल. आम्हाला अजबच वाटलं. हे म्हणजे रेशनिंग दुकानासारखं झालं. दुकानात धान्य नाही आणि काळ्या बाजारात भरपूर. आम्हाला आमचं बाळ कायद्याच्या चौकटीत राहूनच पाहिजे होतं, विकत घ्यायचं नव्हतं. त्यामुळे मी म्हटलं की कितीही त्रास झाला तरी चालेल पण असे पैसे देणार नाही. शेवटी एके दिवशी शांतपणे विचार केला की आता नाद सोडून देऊयात आणि आपल्या कामावर लक्ष केंद्रित करूया. आणि आश्चर्य म्हणजे अगदी त्याच दिवशी दुपारी संस्थेतून फोन आला की बाळ बघायला या. सगळ्या प्रक्रिया पूर्ण होऊन ऑगस्टला गाथा घरी आली. सहा महिन्यानंतर बरेचसे रिपोर्ट चालत नसल्यामुळे पुन्हा काही टेस्ट्स, आणि

आर्थिक कागदपत्रांची पूर्तता करावी लागली. या सगळ्या प्रक्रियेतून जात असताना आणि आत्ताही वाटतं की दत्तक घेणं ही इतकी वेळखाऊ आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे की बरेचजण अर्ध्या वाटेतूनच परत फिरतात. एकतर अजूनही दत्तक मूल ही कल्पनाच बऱ्याच जणांना पचत नाही. जे पुढे जातात त्यांना या सगळ्याला तोंड द्यावं लागतं. मात्र मुलांना जन्म देणं ही आपल्याकडे किती सहजपणानं होणारी घटना आहे! ना फारसा विचार, ना कोणती प्रक्रिया. जाणीवपूर्वक विचार करून मूल जन्माला घालणारे अजूनही खूप कमी लोक आहेत.

दत्तक घेण्याचा निर्णय ते प्रत्यक्ष गाथा घरी आल्यानंतरचा काळ यात अनेक बरेवाईट अनुभव आले. मूल नसणे हा जणू काही अपराधच असे समजून लोक जे काही बोलतात आणि त्या बाईला मानसिक त्रास देतात हा एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे. त्यात आत्ता नाही जात. काही अनुभव मात्र शेअर करावेसे वाटतात.

1) दत्तकप्रक्रिया सुरू असताना एका मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका कम प्राचार्य असे म्हणाल्या की, “अग, मुलांची एवढीच हौस असेल तर एखाद्या अनाथाश्रमात जाऊन मुलांशी खेळत जा. घरी मात्र आणू नकोस बाई. दत्तक मुले फार वाईट असतात. आपली मुले ती आपलीच मुले ना शेवटी!”

2) गाथाला घेऊन येण्यासाठी आम्ही सोलापूरला निघण्याच्या आदल्या दिवशी पुण्यातल्या काही पत्रकार मैत्रिणींची मीटिंग होती. मी जातेय हे ऐकल्यावर एकजण म्हणाली, “ए अजिबात घेऊ नकोस बरं दत्तक. आमच्या ओळखीच्या एकांना खूप त्रास दिलाय दत्तक मुलाने.” उद्या बाळ घरी येतंय हे कळूनही ती असं बोलत होती.

3) माझ्या ओळखीच्या एका डॉक्टर बाईंनी तर दत्तक मूल कसे वाईटच असते याचं एक भयंकर चित्रच उभं केलं.

4) गाथा घरी आल्यावर भेटण्यासाठी खूप जण येत होते, त्यांपैकी आयटीत काम करणारं एक प्रेग्नंट जोडपं आलं. त्यातली ती म्हणाली, “वहिनी, असं उचलून आणलेल्या मुलाला माया लागते का हो?” हे खरंच तिच्या तोंडचं वाक्य आहे, एक शब्दही मनाचा नाही. मी अक्षरशः अवाक !

5) एक इंजिनियर मित्र म्हणाला, “आम्हाला बऱ्याच प्रयत्नांनी मूल झालं. एकदा दत्तक घेण्याचा विचार मनात आला होता पण सुदैवाने (?) ती वेळ

आली नाही. आणि मुलगी का घेतलीस? मुलगा तरी घ्यायचा. (घ्यायचा? बाजार आहे का हा?) बरं, मुलगी तुझ्यासारखी आहे का अनिलसारखी?" अनिल गोरा आहे आणि मी सावळी. मी सांगितलं, माझ्याहून सावळी आहे, तर लगेच तो म्हणाला, "घिऊन घ्यायची मुलगी तर गोरी तरी घ्यायची ना किमान!" मी मनात म्हटलं, बर झालं, याने दत्तक घ्यायचा जास्त विचार नाही केला ते! एक मूल सुटलं अशा विचारसरणीच्या लोकांमधून.

6) एक ओळखीचे काका भेटले रस्त्यात. तेही असेच म्हणाले, "मुलगी कशाला, मुलगा तरी घ्यायचा दत्तक!"

7) माझी एक नातेवाईक व तिच्या नवरा ह्यांना तर हा निर्णय अजिबात आवडला नाही. त्यांच्या मते असे मूल आणण्यापेक्षा नातेवाईकांमधले मूल दत्तक घ्यायचे. ती भेटायला आली बऱ्याच दिवसांनी तेव्हा एकूण सगळे चांगले चित्र बघितल्यावर तिने घरी जाऊन मला फोन केला आणि मला आवडले नव्हते ते चुकीचे होते असे मोकळेपणाने कबूल केलं.

8) एका जवळच्या आजोबांनी एक वर्षभर गाथाला जवळ घेतलं नव्हतं.

9) एका ग्रुपमध्ये गाथाला स्वावलंबी करण्याच्या हेतूने मी काही बोलले होते तर एकजण पटकन म्हणाली, "तू असं वागू शकतेस कारण ती दत्तक आहे ना, तू जन्म दिला नाहीस तिला."

10) पालक अभ्यासमंडळ सुरू झाल्यानंतर जे पालक - पुष्कळदा आले होते पण नंतर आले नाहीत त्यांना फोन करत होते तेव्हा एक दत्तक बाबा मला म्हणाले, "हे बघा आम्हाला नाही वाटत अशा अभ्यास मंडळाला यावं, आम्ही त्याला आमचं आडनाव दिलंय हेच आमच्या दृष्टीनं खूप मोठं काम केलंय."

11) एक पत्रकार मैत्रीण म्हणाली, "मुलगी घेतलीस ते छानच ग, पण तिची जात वगैरेचं काय ग आणि तिची हिस्ट्री?" "आम्ही जात-धर्म मानत नाही आणि ती आता आमच्याच जातकुळीची झाली ना ग, तिची हिस्ट्री आता आमच्यापासूनच सुरू", असं मी म्हटल्यावर सुद्धा तिनं तिचा जात-पातीचा हेका सोडला नाही.

हे सगळं ऐकताना माझ्यातल्या आईला खूप वाईट वाटायचं, वाटतं. किती असंवेदनशीलता! मधल्या काळात स्त्रीभ्रूणहत्येच्या इतक्या केसेस उघडकीस आल्या तेव्हाच आम्ही मुलगीच घरी येणार असं जाणीवपूर्वक ठरवलं आणि संस्थेला तसं सांगितलं. दत्तक मुलं वाईट असतात तर मग जे जे

वाईट कामे करतात ती सगळीच दत्तक मुलंच असतात का? आणि अशी किती दत्तक मुलं या लोकांनी पाहिलीत? मुलांवर असं लेबलिंग करणं किती अमानुष आहे! आणि मुलांना जन्म देऊनच आई होता येतं का? मुलगा- मुलगी, काळी - गोरी, जात -धर्म अशा मनातल्या भिंती तर अजून भक्कमच आहेत.

गाथाला घरी घेऊन येण्याआधी आठ दिवस आम्ही दोघे संस्थेत रोज दिवसभरासाठी जायचो. तिच्याशी खेळायचो. त्यावेळी इतर मुलं हात पसरून मला पण घ्या म्हणून मागे लागायची, रडायची. गाथाला घरी घेऊन येताना एकीकडे आनंद आणि दुसरीकडे या सगळ्या मुलांना मी नाही न्याय देऊ शकत या जाणिवेनं इतकी रडलेय मी! आजही अनेकदा जेव्हा संस्थेत जाते तेव्हा सगळी मुलं आपल्याला स्पर्श करायला धडपडत असतात, आपल्याकडे झेपावत असतात, तेव्हाही गलबलून येतं. घरी आल्यानंतर ती बराच काळ माझ्या कुशीत झोपायची नाही, बेडच्या जवळच्या खिडकीच्या गजांना धरून झोपायची. कारण संस्थेत पाळण्यात अशीच झोपतात ना मुलं. तेव्हाही खूप वाईट वाटायचं पण तिला तिचा वेळ घेऊ दिला. आता ती मस्त कुशीत झोपते.

ती दोन वर्षांची असताना ढगांच्या गडगडाटानं घाबरायची तेव्हा तिला तिच्या काकूने सांगितलं होतं की, अजिबात घाबरायचं नाही, ढग आनंदानं टाळ्या वाजवत असतात. एकदा मी आजारी होते. आम्ही दोघी शेजारी शेजारी पडलो होतो. जोरात गडगडत होतं. मला माहीत होतं की गाथा जागी आहे ते, पण मग ती मला झोपू देणार नाही म्हणून मी तशीच पडून राहिले. अर्ध्या तासानं मी तिच्याकडे पहायला आणि तिने माझ्याकडे पहायला गाठ पडली. तेव्हा इतक्या केविलवाण्या आवाजात ती म्हणाली, “आई, धग आपल्याला काइ नाई कलत, ते ताल्या वाजवत अशतात.” माझं बाळ किती घाबरून गेलं होतं, तरीही तिनं मला उठवलं नाही, तशीच पडून राहिली आणि मी मात्र झोपण्याचं नाटक करत होते. संस्थेतही छोटी छोटी बाळ असतात, किती प्रकारचे वेगळे वेगळे आवाज त्यांच्या कानावर आदळत असतील, त्यांना भीती वाटत असेल पण त्यांना त्यावेळेस घट्ट जवळ घेणारं कोणीच नसतं, या विचारांनी आजही मला खूप गलबलून येतं. संस्थेतल्या आया, मावशा इतक्या मुलांना कशा पुऱ्या पडणार? घरात एक मूल आणि त्याच्या भोवती बरीच माणसं आणि याउलट स्थिती संस्थेत. मला वाटतं, ज्या वयात सर्वात जास्त स्पर्शाची ऊब हवी असते मुलांना त्याच वयात ती याला मुकतात. त्यामुळे

स्पर्शाची खूप जास्त गरज असते दत्तक मुलांना. त्यामुळे ज्यांना काही काम करायचे असेल, वेळ असेल त्यांना मी सांगत असते की संस्थेत जाऊन मुलांशी खेळा, त्यांना जवळ घ्या, ती जास्त गरज आहे.

दत्तक मुलांमध्ये इनसिक्युरिटीचं प्रमाण जास्त असतं. एकतर गर्भावस्थे-पासूनच अस्वीकार, नाकारलेपणाची भावना. त्यात आईचा ओळखीचा आवाजच ऐकू येणं बंद होतं त्यामुळे जास्त असुरक्षित वाटतं. हे सांगताही येत नाही. ही मुलं लवकर जुळवून घ्यायला शिकतात खरं पण मनातून घाबरलेली असतात. मी हे खूप अनुभवलंय गाथाच्या बाबतीत. काही वेळा त्यामुळे थोडे वेगळे वागावे लागते या मुलांशी. अर्थात प्रत्येक मुलाचे अनुभव वेगळे.

गाथा घरी आल्याच्या दिवसापासून मी तिला गोष्टींच्या माध्यमातून ती दत्तक असल्याचं सांगतेय. एक नवरा-बायको असतात, त्यांना एके दिवशी आई-बाबा अशी कुठूनतरी हाक ऐकू येते, मग ते सगळीकडे शोधतात. शोधताना त्यांना पाखर (गाथाचं आजोळ) दिसलं. तिथं राणीआजी होती, ती त्यांना एका बाळाजवळ घेऊन गेली, ते बाळच त्यांना आई-बाबा अशी हाक मारत होतं. मग बाळ तिच्या घरी आलं. आणि सगळं घर आनंदानं भरून गेलं. ते बाळ म्हणजे गाथा! एक कोकीळ आई खूप आजारी असते, तिला तिच्या गोड बाळाला सांभाळणे शक्य नसते म्हणून ती छान आई बाबा शोधत असते तेव्हा तिला कावळा कावळी दिसतात. मग त्यांच्या घरट्यात ती तिच्या पिल्लाला ठेवते. कृष्ण यशोदा अशा काही गोष्टींच्या माध्यमातून तिला आम्ही कल्पना देतो. मधून मधून पाखरमध्ये घेऊन जातो, तिचा पाळणा दाखवतो. कधी कधी आमची परीक्षा घेणारे नाजूक प्रश्न ती विचारते तेव्हा कठोर होऊन योग्य ती उत्तरे द्यावी लागतात कारण आत्ता भावनेच्या भरात खोटे बोलणे म्हणजे तिचे भले नाही हे उमजते. गाथा ही सर्वस्वी आमचा निर्णय आणि जबाबदारी आहेच, पण जवळची सारी माणसं पण तिच्यावर खूप प्रेम करतात, तिला वेळ देतात याचा आनंद खूप मोठा आहे. अनेक चांगल्या अनुभवांची शिदोरीही सोबत आहे आमच्या या तीन वर्षांत. गर्भसंस्कार वगैरे बाबत मी संभ्रमात आहे. बाकी संवेदनशीलता तर तुमच्या रोजच्या वागण्यातून रुजते मनात मुलांच्या. त्यामुळे अनेक बाबतीत मला भरून येतं. असं संवेदनशील बाळ माझं आहे याचा माझा मलाच हेवा वाटतो.

ईमेल: smeeta.patil@gmail.com

# पुस्तक परिचय : क्रिएटिव्ह पास्ट (१)

*नंदा खरे*

सर्जक भूतकाळ , मराठी इतिहासलेखन

---------------------------------------------------------------------------

इतिहास हा विषय असा आहे की जो कधी बदलत नाही, असे (नेमाडेंच्या कादंबरीतील इतिहासाच्या प्राध्यापकाप्रमाणे) वाटण्याचे दिवस केव्हाच संपले. मराठीतले इतिहासलेखन म्हणजे तर विविध अस्मितांनी भारलेल्या इतिहासकारांचा आविष्कार. महाराष्ट्र राज्य निर्मितिपूर्वीच्या २६० वर्षांच्या इतिहासलेखनाचे जातीय-राजकीय ताणेबाणे उलगडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेल्या महत्त्वाकांक्षी पुस्तकाचा परिचय खास नंदा खरेंच्या शैलीत ...

---------------------------------------------------------------------------

'फक्त महाराष्ट्रालाच इतिहास आहे. इतर प्रांतांना केवळ भूगोल असतो', हे अनेक महाराष्ट्रीयांचे मत अनिल अवचट आपल्या बिहारमधल्या 'पूर्णिया' जिल्ह्याबद्दलच्या पुस्तकात सुरुवातीलाच नोंदतात. नंतर मात्र गौतम बुद्ध बिहारमध्येच वावरून गेला हे आठवून महाराष्ट्रीय मत किती उथळ आहे हे अवचटांना जाणवले! एकूण एखाद्या समाजाचा स्वाभिमान, स्वतःचे वैशिष्ट्य काय यावरील मत, स्वतःची 'ओळख' यांचा इतिहासाशी जवळचा संबंध असतो. महाराष्ट्रात तर तो फारच जवळचा आहे.

त्र्यंबक शंकर शेजवलकर लिहितात, ''इतिहास माणसाला शहाणा करतो असे बेकन समजत होता. पण आज इतिहास माणसाला पागल बनवताना दिसतो.'' पुढे ते म्हणतात, ''अनेक हुशार डोकेबाज माणसे खरा इतिहास जाळून टाकण्यात, निदान दडपण्यात, किमान विकृत करण्यात, गुंतलेली, गढलेली आहेत.'' लेख 1940 सालचा आहे त्यामुळे 'हुशार डोकेबाजां'च्या यादीत पहिले नाव मार्क्सवाद्यांचे आहे. मग इतरांच्या राष्ट्रांना कमी लेखणाऱ्या, आपापल्या संस्कृतींना श्रेष्ठ ठरवणाऱ्या अशा अनेकांची यादी आहे. मग महाराष्ट्राकडे येत शेजवलकर म्हणतात, ''... मराठ्यांचा इतिहास म्हटले तरी कोणी त्याचा अर्थ मराठे क्षत्रियांचा इतिहास असे समजतात; कोणी

कुणब्यांनाही त्यात गोवतात; कोणी ब्राह्मणांचा पेशव्यांचा इतिहास म्हणजेच मराठ्यांचा इतिहास असे समजतात." अनेक जाती-पोटजातींचा उल्लेख करून ते म्हणतात, "...आज मराठीत पांढऱ्यावर काळे करून लिहिलेल्या इतिहासांपैकी तीन-चतुर्थांश भाग एकांगी, अतिशयोक्तिपूर्ण, विपर्यस्त, खोटा आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही." हे सारे एका जेमतेम दोन पानी लेखात शेजवलकर सांगतात. लेख आहे, 'महाराष्ट्राच्या मानगुटीचा समंध' (नवयुग, 21 जाने. 1940). चुकीच्या इतिहासाची अनेक उदाहरणे देत ते तसे करण्याच्या प्रयत्नांची "उत्तरक्रिया झाल्याशिवाय महाराष्ट्राला बरे दिवस दिसण्याची आशा नको! तोवर इतिहासाच्या क्षीराऐवजी दुरभिमानाचे काळेकुट्ट नीरच हाती येणार!" असा सज्जड इशारा देतात.

य. दि. फडकेही मराठी भाषक शरीराने विसाव्या शतकात राहताना मनाने मात्र मराठा कालखंडात राहतो, असे शेजवलकरांनंतर सुमारे पन्नास वर्षांनी नोंदतात (1989).

आज त्यालाही पाव शतक होऊन गेले आहे आणि दुरभिमान, पागलपणा वगैरेंमध्ये वाढच झाली आहे.या दोन्ही ज्येष्ठ इतिहासकारांची मते वाचून बरेच प्रश्न तपासावेसे वाटतात.

'खरा' इतिहास म्हणजे नेमके काय? एखाद्या प्रदेशात एखाद्या काळी काय काय घडले याचा घटनाक्रम वेगवेगळ्या पुराव्यांनी ठरवता येईलही. पण जे घडले ते का घडले? त्यात भाग घेणाऱ्यांच्या कृतींमागचे हेतू काय होते? त्या हेतूंमागे कोणत्या आशा, आकांक्षा, अपेक्षा होत्या? प्रत्यक्षात केलेल्या कृतींना पर्याय उपलब्ध होते का? मग त्यांमधून हीच कृती का निवडली? अशा प्रश्नांना उत्तरे देणारे पुरावे कोणते? इतिहासलेखनामागे कोणकोणत्या प्रेरणा असतात? एक प्रेरणा 'मला कळलेले सत्य इतरांसाठी नोंदणे' ही असणारच. मग 'व्यक्ती तितक्या प्रकृती'सारखे 'व्यक्ती तितके इतिहास' असे म्हणावे का? मग वेगवेगळ्या व्यक्ती, त्यांचीच 'ओळख' असणारे समाजगट, हे 'आमचाच इतिहास खरा' असे म्हणणारच ना? सोबतच 'त्यांचा इतिहास विपर्यस्त, खोटा' असेही म्हणणारच ना?

एक प्रेरणा आपल्याभोवतीच्या समाजाला विशिष्ट दिशेला वळवण्याचीही असू शकते. मग इतिहासातल्या घटनांच्या वर्णनांत एकांगीपणा, अतिशयोक्ती हेही येणारच. या समाज 'सुधारण्या'च्या प्रेरणा इष्ट समजायच्या की अनिष्ट?

मराठी वाचक बहुतेक अकादमीय इतिहासकारांपेक्षा ऐतिहासिक चरित्रे, कादंबऱ्या, चरित्रात्मक कादंबऱ्या वगैरेंकडे जास्त वळतात. मराठी समाजाच्या मनांतील इतिहासात काय घडले याबाबतच्या आठवणी अशा तऱ्हेने कमीजास्त अनैतिहासिक रचनांमधून, साहित्यकृतींमधून घडतात. सिनेमे, नाटके, दूरदर्शनमालिका वगैरेंमधून तर हे जास्तच प्रभावीपणे घडते. आणि अखेर 'मराठी माणूस' याची व्याख्याही अशा आठवणींमधूनच घडते. इतर माणसांपेक्षा मराठी माणूस वेगळा कसा याची ओळखही अखेर 'अनैतिहासिक' आठवणींमधून घडते!

या प्रक्रियेचा महाराष्ट्रापुरता अभ्यास करणारे पुस्तक आहे **'क्रिएटिव्ह पास्ट्स'** (*Creative Pasts*, **प्राची देशपांडे,** Permanent Black, 2007). पुस्तकाच्या नावात जे 'सर्जक भूतकाळ (अनेकवचनी!)' आहेत ते महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळ्या वेळी लिहिलेल्या इतिहासांमधून आणि ऐतिहासिक साहित्य, नाटके, चित्रपट वगैरेंमधून घडलेले आहेत. पुस्तकाचे उपशीर्षक आहे 'पश्चिम भारतातील ऐतिहासिक स्मृती आणि ओळख 1700-1960'. लक्ष्य आहे महाराष्ट्र हे.

आधी होत्या बखरी. त्यांना पाल्हाळीक, पक्षपाती, बेभरवशाच्या म्हणतच ग्रँट डफने आपली 'मराठ्यांची बखर' मात्र त्यांच्याच मदतीने लिहिली. दृष्टिकोन होता मराठ्यांना हरवणाऱ्या इंग्रजी वसाहतवादाचा.

मग ग्रँट डफचे दोष दाखवत, त्याचा प्रतिवाद करत मराठी इतिहास-संशोधक दप्तरखाने धुंडाळत आपला इतिहास लिहू लागले. अनुभवसिद्ध (empirical) संशोधनाची शिस्त मराठी नसून इंग्रजी वळणाची होती. हेतू मात्र होता मराठ्यांना एक वेगळी 'ओळख' देण्याचा, मराठी अस्मिता जागवण्याचा. यासाठी दप्तरखान्यांपेक्षा कथा-कादंबऱ्या, नाटके, चित्रपट, पोवाडे, लावण्या, शिवजयंती उत्सवातले मेळे वगैरे जास्त उपयोगी होते.

सुरुवातीला हे सगळे उद्योग करणारे मुख्यतः ब्राह्मण होते. तेव्हा ब्राह्मण अखेर शिवाजीलाही 'चोरतील' या भीतीने ब्राह्मणेतर या उद्योगांत उतरले.

मग ब्राह्मणेतरांमध्ये तट-गट पडू लागले.

हे सर्व सामने, ही सर्व रस्सीखेच, हा मूलभूत मानवी व्यवहार देशपांडे जिवंत करतात. सोबतच आणि आपोआपच या व्यवहारांपासून दूर ढकलले गेलेल्यांची कैफियतही त्या मांडतात. प्रत्येकच 'तथ्या'वर झगडे उभे

करण्यातले धोके, पागलपणा, दुरभिमान, सारे देशपांडे सादर करतात; आणि तेही संशोधनपर लिखाणातून!

सोबतच देशपांडे एका नाजुक मुद्यालाही हात घालतात. महाराष्ट्राभिमान आणि भारताभिमान यांच्या तणावपूर्ण संबंधावर लिहिताना त्यामागील लिंगविचारी (gender) भूमिका त्या उलगडून दाखवतात. एकूणच मूलभूत बंडखोर (radical) भूमिका प्रत्यक्ष न घेताच ती कशी सुचवता येते याचा हा वस्तुपाठ आहे.

इतिहासाचे आकलन ही 'चल', dynamic प्रक्रिया आहे; थिजलेला फोटो-अल्बम नव्हे की एकाच कॅमेऱ्याने टिपलेले आंशिक चलचित्र नव्हे. त्या आकलनातूनच व्यक्ती आणि समाज आपण कसे घडलो यावरची 'आठवण' घडवतात. इतर व्यक्ती आणि समाजांपेक्षा आपण वेगळे कसे व का, ते ठरवून ती आपली 'ओळख' म्हणून सांगतात. ही सर्व प्रक्रिया महाराष्ट्रापुरती, मराठी माणसांपुरती कशी घडली ते देशपांडे सांगतात. हा मराठी इतिहासलेखनाचा इतिहास तर आहेच; पण सोबतच मराठी अस्मितेचाही इतिहास आहे. पण अस्मितेत जो गर्वाचा, दुरभिमानाचा भाव असतो, तो मात्र पुस्तकाच्या वाचनाने नष्ट होतो!

दोष दाखवायचा तर येवढाच, की हा इतिहास 1960 पर्यंतचे लेखनच तपासतो. यामुळे नंतरच्या इतिहासलेखनाचा, कादंबऱ्यांचा, नाटक-सिनेमांचा यात समावेश नाही. एखादवेळी असा लेखन आणि त्याचे विश्लेषण यांच्यात कालावकाश ठेवणे देशपांड्यांमधल्या संशोधकाला आवश्यक वाटले असावे.

वाचकाने मात्र मराठी माणूस म्हणूनच ही कहाणी आजपर्यंत, जेम्स लेन-गोविंदराव पानसऱ्यांपर्यंत, पुरस्कार वापसी व दिनानाथ बात्रांपर्यंत आणावी.

त्यासाठी आवश्यक असा पुस्तकाचा परिचय यापुढे देत आहे.

## वसाहतपूर्व काळातले इतिहासलेखन

अत्ताअत्तापर्यंत नागालँडचे प्रशासन गाव-बुढा व दुभाष (बोलीभाषेत 'जीबी' व 'डीबी') यांच्या मदतीने चालत असे. प्रत्येक गावाच्या किंवा जमातीच्या अलिखित नियमांची आठवण-साठवण गावातला वृद्ध सांभाळत असे आणि स्थानिक बोली आणि शासकीय भाषा यांच्यात संवाद दुभाष्या साधून देत असे. आजही कुठेकुठे ही जीबी-डीबी दुक्कल वापरात असेल, पण

मुख्य प्रवाह मात्र भारतीय कायदे जाणणाऱ्या स्थानिक साक्षरांच्या हाती आहे. असे बदल वेगवेगळ्या काळांत भारतभर झाले आहेत. महाराष्ट्रात तरी सतराव्या शतकापासून गाव-बुढ्यांचे काम लिखित दस्तावेज करू लागले होते.

वेगवेगळे सामंत-जमीनदार आपले मालकीचे व वहिवाटीचे हक्क कसे उपजले याचे वृत्तांत लिहून घेऊ लागले. स्थानिकांना माहीत असलेल्या या घटना घडतेवेळी आसपास काय महत्त्वाचे घडत होते हेही या वृत्तांतांत नोंदले जाई. जरी सामंतांचे लेखनिक हे वृत्तांत लिहीत तरी अनेकदा त्यांचे जाहीर वाचन होऊन त्यांना समाजमान्यता मिळवून दिली जाई.

पुढे सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी सैन्ये आसपासचे प्रदेश जिंकून घेऊ लागली. अशा कमावलेल्या प्रदेशांमधील हक्क व वहिवाटी, कर-आकारणीची प्रमाणे यांचेही वृत्तांत लिहून घेतले जात व संदर्भासाठी शेजारच्या क्षेत्रांतील समकालीन घटनाही नोंदून ठेवल्या जात. होता होता या नव्या प्रदेशांतही सामंती राज्ये किंवा संस्थाने घडू लागली. त्यांचे संस्थानिक एकमेकांच्या दरबारांत वकील नेमू लागले. हे वकील आपापल्या धन्यांना आपल्या कार्यक्षेत्रांतील घडामोडींचे वृत्तांत लिहून पाठवू लागले. या अखबारांमध्ये घडामोडींमागील ताणतणाव, शत्रुता-मित्रतेच्या नव्या शक्यता व संधी वगैरेही नोंदले जाई. यांचा नमुना चाकराचे मालकास पत्र असा असे; पण हा इतिहासही असे आणि त्याचे विशिष्ट हेतूने केलेले मूल्यमापनही असे.

होता होता 'कायदेशीर मान्यतेसाठीचे वृत्तांत' याच्या पलिकडची, गुंतागुंतीची इतिहासलेखने घडू लागली व त्यांना 'बखरी' हे नाव पडले. कधीकधी राजघराण्यातली माणसे एखाद्या घटनेत, मोहिमेत वा कालखंडात नेमके काय घडले हे जाणून घेण्यासाठी बखरी लिहवून घेत. जसे, 1694 च्या सुमारास शिवाजीचा धाकटा मुलगा राजाराम याने कृष्णाजी अनंत सभासद याला शिवकालाचा वृत्तांत लिहायला सांगितले, जो वृत्तांत आज 'सभासद बखर' म्हणून ओळखला जातो.

अशा बखरींमध्ये वाचनीयता आवश्यक असे. म्हणी, पौराणिक दाखले, अलंकारिकता, पुढच्या प्रसंगांचे मूळ मागच्या प्रसंगांत शोधणे वगैरेंचा उपयोग सढळ हाताने केला जाई. सोबतच बखरकार आपल्या लिहवित्या धन्याला सोयीस्कर घटनांवर जोर देत तर गैरसोयीचा भाग पुसट करत. दावा मात्र असे की स्वानुभव, तपासलेलले दस्तावेज, छाननी केलेले साक्षीपुरावे अशा सा-

यांतून 'यथातथ्य' इतिहासच नोंदलेला आहे. जसे; एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला लिहिलेली 'पेशव्यांची बखर' असा सूर लावते की शिवाजीचा नातू शाहू याने आपला सर्वांत विश्वासू सेवक म्हणून पेशव्यांना जणु काही आपला उत्तराधिकारी नेमले व ते पद वंशपरंपरेने दिले जाऊ लागले. साधारण याच सुमाराला दुसऱ्या शाहूने लिहवून घेतलेली 'चिटणीस बखर' मात्र पेशवे मुळात शिवाजीचेच धोरण पुढे चालवत असत यावर भर देते. पेशव्यांचे बहुतेक निर्णय सातार-छत्रपतींच्या मार्गदर्शनानेच घेतले जात यावरही 'चिटणीस बखर' भर देते. 'पेशव्यांची बखर' पेशवाईत धर्मकार्ये करत ब्राह्मणांना सुखात ठेवले होते हे ठसवते. 'चिटणीस बखर' राजकीय व युद्धकौशल्याने धर्म राखण्यात आला, तोही सातार-गादीचे आदेशाने, असे ठसवते.

कधीकधी तर एखादी बखर दुसऱ्या बखरीच्या खंडनासाठीच लिहवून घेतली जाई. 'भाऊसाहेबांची बखर' पानिपतच्या मोहिमेत शिंद्यांच्या भूमिकेची भलावण करते. तिच्यानंतरची 'होळकरांची कैफियत' मात्र होळकरांचा दोष कसा नव्हता यावर भर देते व काही दोष शिंद्यांवर टाकते.

बखरी वाचणाऱ्यांमध्ये, वाचवून घेणाऱ्यांमध्ये राजकारणी, मुत्सद्दी, फडणीस वगैरे विविध लोक असत. लिहिणारे मात्र नेहेमीच लेखनपेशा लोक असत जे बहुशः ब्राह्मण, प्रभू वगैरे जातींचे असत. अर्थातच बहुतेक बखरी लेखनपेशा लोकांचे धोरणे ठरवण्यातले व अंमलात आणण्यातले योगदान आडवळणाने पण सातत्याने बखरींमध्ये नोंदत असत.

एकूण बखरींचे वाचन दाखवते की महाराष्ट्राच्या राजकारणात विविध सत्ताकेंद्रे असत व ती एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नांत असत. पण तरीही सर्व बखरींमध्ये काही सूत्रे सापडतात जी काही समान बाबी ठसवू पाहतात.

जसे, 'सभासद बखर' शिवाजीचा मुघल सत्तेशी संघर्ष नोंदतानाच शिवाजी इतर मराठी सामंतांपेक्षा कसा वेगळा होता ते ठसवते. जुनी, 'यावनी' पद्धत मोडून 'नवी' मराठी पद्धत बसवली जात होती. या नव्या पद्धतीचा जाहीरनामा म्हणजे 'आज्ञापत्र'. त्यात वर्णन केलेली शिस्त सामंती व्यवस्थेत कितपत आली हे विवाद्य आहे. पण शिवाजी काय घडवू पाहत होता याचे चित्र आज्ञापत्रात स्पष्ट आहे.

याचीच बदललेली आवृत्ती असावी असा सूर 'पेशव्यांची बखर' व

नंतरच्या काही बखरी लावतात. मुख्य शत्रू अजूनही मुघल सत्ता हाच आहे; पण आता उत्तर भारतातील हिंदू सामंतही मराठी सरदारांना विरोध करत आहेत. यामुळे 'पेशव्यांची बखर' एक 'महाराष्ट्र धर्म' ही संकल्पना सुचवते, जी हिंदुस्थानी, किंवा खरे तर उत्तर हिंदुस्थानी धर्माला पर्याय पुरवते. महाराष्ट्र धर्म नेमका काय याचे उत्तर फारतर काही राजकीय व सैनिकी तंत्रे, वागणुकी यांतूनच देता येते. सर्व महाराष्ट्रीय समाजाला लावता येईल असा काही 'धर्म' नाही. पण पेशवे व सातारकर, नागपूरकर, शिंदे, होळकर इत्यादींमध्ये कुरबुरी व संघर्ष असतानाही काही एक समान सूत्रही होते, असे बऱ्याच बखरी सुचवतात.

तरीही एकसंधतेची, 'महाराष्ट्र हा माझा मायदेश (इंग्रजीतल्या patria या संकल्पनेसारखा) आहे' ही भावना घडलेली दिसते. सी.ए.बेली (C.A.Bayly) हा इतिहासकार मायदेश ही भावना रुजवायला तीन घटक आवश्यक असतात असे मानतो; आणि तीन्ही घटक महाराष्ट्रात सतराव्या शतकापासून भेटतात.

एक म्हणजे सर्व समाजघटकांत बऱ्याच प्रमाणात भाषा व संस्कृती एकच होती. याचे श्रेय मुख्यतः संतकवींच्या (वारकरी) भक्तिपरंपरेकडे जाते. इथेही थोडेफार अंतर्गत ताण आहेत, अगदी आजही ते जाणवतात. जसे, 'चिटणीस बखर' रामदासाने शिवाजीला लिहिलेले काव्यपत्र उद्धृत करते. चिटणिसांना यातून शिवाजीच्या प्रयत्नांना भक्तिपरंपरेचे समर्थन होते असे सुचवायचे असावे. पुढे मात्र (इतिहासाचार्य) राजवाड्यांनी यातून शिवाजीचा गुरु रामदास होता असा निष्कर्ष काढला, ज्यातून बराच वाद उपजला. संतकवींइतकेच श्रेय पोवाडे व लावण्या लिहिणाऱ्या, गाणाऱ्या तंतकवींना द्यायला हवे. सर्व समाजाला एकीची भावना पुरवण्यात शौर्याच्या गाथा (पोवाडे) आणि बहुतांशी शृंगारिक समाजवर्णने (लावण्या) यांचा मोठाच वाटा आहे. इथेही (पुन्हा!) अंतर्गत ताण भेटतात, कारण रामजोशी हा ब्राह्मणकवी राज्याचे वर्णन करताना 'ब्राह्मणी राज्य जोरदार' असे सांगतो. [ संतकवी आणि तंतकवी यांमधली पंडिती पंतपरंपरा मात्र जास्त ब्राह्मणी होती, आणि भाषिक-सांस्कृतिक एकीच्या भावनेत ती महत्त्वाची नाही. - खरे ]

मायभूमीच्या संकल्पनेला राजसत्तेचा आधारही लागतो. 'नवी' पद्धत, 'महाराष्ट्र धर्म' या संकल्पना बखरींमध्ये नोंदल्या जात होत्या तशाच त्या दैनंदिन व्यवहारांतही ठसवल्या जात असत. राजपूत धर्म, मोगलाई मसलत

यांसारखे सार्वत्रिक शब्दप्रयोग दाखवतात, की 'आपण' आणि 'ते' अशा तुलना सततच्या होत्या.

आणि मायभूमीबद्दल आस्था वाटायला लावणारा तिसरा मुद्दा म्हणजे 'आपण विरुद्ध ते' ही भावना समाजाच्या सर्व थरांत रुजणे. पोवाडे-लावण्या, आख्याने-कीर्तने, यांतून वेळोवेळचे शत्रू सामान्य लोकांना माहीत होत असत. विजापुरकर, दिल्लीकर, निजाम, जाट, रोहिले-अफगाण, टिपू, साऱ्यांची सामान्य लोकांनाही ओळख असे. आक्रसत्या राज्याच्या काळात तर तो स्वानुभव असे. [ विसाव्या शतकाच्या शेवटच्या चरणात मी परतूरजवळ काम करत होतो. एकदा कामावर उल्लेख झाला, की पानिपताची मोहीम परतूरपासून सुरू झाली. उल्लेखाला आधार म्हणून शेजवलकरांचे 'पानिपत-1761' मी दाखवले. पुढील काही महिन्यांत लोहार-सुतारांपासूनच्या मराठी कामगारांनी पुस्तकाच्या वाचून पत्रावळी केल्या, कारण पानिपतचा पराजय सर्वांना माहीत होता. - खरे ].

**वाघिणीचे दूध**

युरोपातली इतिहासलेखनाची पद्धत वेगळी होती. काय घडले ते नोंदण्यावर न थांबता ती पद्धत घटनांचे नैसर्गिक आणि सांस्कृतिक कोंदणही तपासत असे. आणिकही पुढे जाऊन युरोपीय पद्धत एखाद्या समाजाची 'संस्कृती' म्हणून अवस्था काय होती तेही ठरवत असे. या दार्शनिक इतिहासलेखना (philosophical historiography) चा महाराष्ट्रातला पहिला मोठा पुरस्कर्ता होता पुण्याचा पोलिटिकल एजंट (आणि पुढे मुंबई इलाख्याचा आयुक्त) माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन. त्याने आपला सहकारी जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ याला या नमुन्याचा महाराष्ट्राचा इतिहास लिहायचे सुचवले.

पेशवाई बुडल्यानंतर (1818) इंग्रजांनी प्रतापसिंह या शिवाजीच्या वंशजाला सातार-गादीवर बसवले. सातारचा पोलिटिकल एजंट म्हणून ग्रँट डफला नेमले गेले. पाच वर्षे ग्रँट डफ मराठी बखरींचा अभ्यास करत होता. प्रतापसिंहाने त्याला तीन दरबारीही मदतीस म्हणून दिले होते. सोबतच या मदतनीसांना मूळ कागदपत्रे जपूनच द्यावी, बखरी एकेक करूनच द्याव्या अशा सूचनाही दिल्या होत्या. अखेर ग्रँट डफच्या इतिहासाची दृष्टी जरी दार्शनिक असली तरी साधने म्हणून बखरीच प्रमुख होत्या!

ग्रँट डफने शिवाजी, थोरला माधवराव यांचे बरेच कौतुक केले; परंतु शिवाजीच्या प्रजेत देशप्रेम, मायभूमीचे प्रेम वगैरे होते हे नाकारले. त्यानेही महाराष्ट्र-धर्मासारखी 'मराठा वृत्ती' (Maratha character) नावाची संकल्पना रचली व सर्व व्यक्तींचे मूल्यमापन ही वृत्ती त्या व्यक्तींत कितपत होती-नव्हती यावरून केले. आधीही अशा वृत्तीची चर्चा होत असे. 'भाऊसाहेबांची बखर'मध्ये मराठ्यांच्या, राजपुतांच्या लढवय्या वृत्तीची चर्चा आहेच. पण अशी चर्चा ठरावीक संदर्भापुरती सीमित असे. डफच्या आधुनिक मांडणीत ती संपूर्ण मराठी समाजाला लागू झाली. राष्ट्रीय अथवा जातीय सरसकटीकरणासाठी हे पायाभूत होते. हे बखरींमधील दृष्टिकोनाविरुद्ध होते. पण या सरासरीकरणामुळे पुढील इतिहास जास्तजास्त जातीयवादी होत गेले. ग्रँट डफ स्वतःला 'मराठा माणूस' म्हणवून घेत असे. पेशव्यांची वृत्ती मात्र 'ब्राह्मणी', असंस्कृत व सैन्याला लुटारू बनवणारी होती असे ग्रँट डफचे मत होते. त्याचा महाग्रंथ 'द हिस्टरी ऑफ द मराठाज' 1826 मध्ये प्रकाशित झाला, आणि 1912 पर्यंत त्याच्या आवृत्त्या निघत राहिल्या. त्याचे एक संक्षिप्त भाषांतर 'ग्रँट डफकृत मराठ्यांची बखर' या नावाने 1830 मध्ये प्रकाशित झाले, व कैक वर्षे ते विद्यापीठांत क्रमिक पुस्तक म्हणून वापरात होते. आश्चर्य म्हणजे, एकोणिसावे शतक संपेपर्यंत हा मराठी समाजाचा एकुलता एक इंग्रजी इतिहास राहिला. अखेर ग्रँट डफच्या पुस्तकाने मराठा-ब्राह्मण वाद जास्तच तीव्र केला.

इंग्रजांनी औपचारिक शिक्षणव्यवस्थाही सुरू केली. तत्त्वतः ती सर्व वर्ण-जातींच्या लोकांना खुली होती, पण एक वेगळाच 'वर्णभेद' त्या पद्धतीचा भाग होता. सातवीपर्यंतचे (व्हर्नाक्युलर फायनल, व्ह.फा.) सर्व शिक्षण मराठीतून असे, तर नंतरचे सर्व इंग्रजीतून. इंग्रजीचे ज्ञान ही वैयक्तिक उत्कर्षाची गुरुकिल्ली ठरली. हे (अर्थातच!) आधीच साक्षर असलेल्या जातींनी ओळखले; व या ब्राह्मण, प्रभू आदी जातींनी सत्ताशिडीच्या मधल्या व वरच्या पायऱ्या भरल्या जाऊ लागल्या. व्ह.फा. फारतर खालच्या पायऱ्या गाठू शकत.

पेन्शनींवर जगणारे संस्थानिक अजूनही बखरी लिहवून घेत, पण त्यांचा हेतू केवळ शौर्यगाथा नोंदून भविष्यातील पेन्शने पक्की करण्याचा उरला. इतर सर्व इतिहासलेखन मुख्यतः इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतरांमधूनच होत असे. ही भाषांतरेही बहुतेककरून संक्षिप्त, क्रमिक पुस्तकांच्या दर्जाचीच असत. इंग्रजी

अंमलाआधीचे सर्व इतिहासलेखन मात्र 'मराठा हस्तलिखिते' या वर्गीकरणात लोटले जाऊन दप्तरखान्यांत बंदिस्त केले गेले. एकूणच स्थानिक बौद्धिक परंपरा खुंटली व तिची जागा इंग्रजी दृष्टिकोनाने घेतली.

मराठी भाषाव्यवहारातही मोठे बदल होत होते. जरी मोडी लिपीतली काही मराठी पुस्तके छापली गेली, तरी छपाईसाठी बाळबोध (नागरी) लिपी जास्त सोईची ठरली. मूळ मराठी बखरींचे व कागदपत्रांचे लिप्यंतर आवश्यक होऊ लागले, आणि मूळ कागदपत्रे तपासून घेणे हे विशेषज्ञांचेच काम उरले. मराठी भाषा संस्कृत, अरबी व फारशी या भाषांमधून, आणि वर स्थानिक प्रभावांमधून घडली असे मानले जात होते. फारशीलाही संस्कृतसारखाच 'अभिजात भाषे'चा दर्जा दिला गेला व ती विद्यापीठीय अभ्यासक्रमांतही पोचली. प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र दोन डगरींवर हात ठेवणे अवघड झाल्याने मराठीचे अभ्यासक जास्तजास्त संस्कृतकडे वळू लागले.

मराठीसह सर्व भाषांना विद्यापीठांत जागा मिळत असतानाच मराठी नियकालिकांना मात्र चालढकलीनंतरच परवानगी मिळत असे.

बौद्धिक परंपरा जरी खुंटली तरी अभ्यासाची, विश्लेषणाची वृत्ती होतीच. या वृत्तीच्या लोकांना एक नवेही काम मिळाले; समाज-प्रबोधनाचे. सुमारे पन्नास वर्षे ब्रिटिश राजवट भोगल्यानंतर 'विविध ज्ञानविस्तार' (1867) आणि 'काव्येतिहास संग्रह' (1878), ही मराठी नियतकालिके सुरू झाली. यांच्या मजकुरात इंग्रजीतून भाषांतरित लेखांसोबतच जुन्या मराठी बखरी, पोवाडे, लावण्या, कविता वगैरेंना स्थान मिळू लागले.

सोबतच नव्या नमुन्याच्या इतिहासाच्या अभ्यासालाही सुरुवात झाली. एक महत्त्वाचे अभ्यासक होते रा.गो.भांडारकर. जुन्या संस्कृत हस्तलिखितांचा अभ्यास करण्याचे मापदंड त्यांनी घालून दिले. प्राच्यविद्या व भारतविद्या (Orientology व Indology) यांची ही भारतीय सुरुवातच होती. भांडारकर चमत्कृतिपूर्ण, अतिशयोक्त लिखाणाचे ऐतिहासिक महत्त्व फार मानत नसत. तसल्या लेखनाच्या काळातील लोकमानसाचे प्रतिबिंब, एवढेच महत्त्व त्यांना मान्य होते. इतिहासाची साधने म्हणूनही पुराणे, महाकाव्ये इत्यादींना ते महत्त्व देत नसत. 'इतिहास' आणि 'साहित्य', 'राजकारण' आणि 'संस्कृती' यांच्यातल्या सीमारेषा भांडारकरांनी फारच ठळक केल्या. परंतु प्राचीन शिलालेख, ताम्रपट, नाणी वगैरेंना त्यांनी प्रथमच इतिहासाच्या

अभ्यासात स्थान दिले. ग्रीक आणि संस्कृत भाषांतील साम्य ठसवत अत्यंत अनाग्रही सुरात भांडारकरांनी भारतीय विद्वानांचे युरोपीय विद्वानांशी समकक्ष असलेले स्थान ठसवले. भारतीय अभ्यासक परक्या अभ्यासकांपेक्षा भारतीय इतिहासाचा जास्त चांगला अभ्यास करू शकतील, हेही मत त्यांनी मांडले.

विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या 'निबंधमाले'तील मांडणीत मात्र काहीही अनाग्रही नव्हते. त्यांना मराठ्यांचा इतिहास मराठ्यांनीच लिहून हवा होता आणि त्याचा हेतू लोकांमध्ये स्वाभिमान जागवणे हाच हवा होता. वसाहतवादी इतिहासलेखनाप्रमाणेच त्यांना राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास हवा होता; पण स्वाभिमान-देशाभिमान मात्र मराठ्यांच्या राजकीय व सैनिकी व्यवहारांतूनच जागवायचा होता. शिवाजीच्या कर्तृत्वाला केंद्रस्थान देण्याचा चिपळुणकरांचा आग्रह ही मराठी राष्ट्रवादाची अगदी सुरुवातीची सूचना होती. चिपळुणकरांना देशाभिमान जागवायचा असल्याने त्यांना इतिहास आणि साहित्य यांतले विभाजनही मान्य नव्हते. कोरडे वस्तुनिष्ठ घटनाक्रमाचे वर्णन त्यांना नको होते. इतिहासाने वाचकांच्या मनांत इतिहास 'जागवला' पाहिजे, असे त्यांचे मत होते. इतिहास हे त्यांच्या दृष्टीने काव्य आणि तत्त्वज्ञान यांच्यातून घडलेले रसायन होते!

चिपळुणकरांपासून प्रेरणा घेतलेले वि.का.राजवाडे मात्र असे मानत नसत. त्यांना काटेकोर दार्शनिक इतिहासच लिहिला जाऊन हवा होता आणि त्यासाठी पुरेशी साधने उपलब्ध करून घेणे हे त्यांना पहिले कर्तव्य वाटत असे. 1898 ते 1922 या दीर्घ काळात त्यांनी अनेक इंग्रजपूर्व कागदपत्रे तपासून ‘मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनां’चे बावीस खंड रचले. सोबतच त्यांचे इतर लेखनही तेरा खंड भरते.

त्यांना केवळ कालानुक्रम ठसवणारा इतिहास नको होता, तर 'समाज' हा मूळ घटक मानून पुढे जायचे होते. ‘राष्ट्र’ व ‘देश’ हे मूळ घटक त्यांना सुरुवातीला मोहवून गेले, परंतु नंतर मात्र ते ‘कौलिक’ ऊर्फ कुलाधारित इतिहासाकडे वळले, ज्याचा अंतिम हेतू मानवेतिहास हा होता.

समाज, त्यांनी रचलेल्या संस्था यांना राजवाडे केंद्रस्थानी मानत हे खरे; पण अखेर समाजाचे यशापयश, त्यांची प्रगती-अधोगती, याचा निकष मात्र राष्ट्रपातळीवरच ठरत असे. एकूणच इतिहासाला केवळ राजकीय न मानणे हे राजवाड्यांचे नावीन्य आहे, पण राष्ट्र (Nation), राज्य (State),

कुल/समाज (social group), लोक (people) या संकल्पनांच्या सीमारेषा राजवाड्यांनी कधीच फार नेमकेपणाने पाळल्या नाहीत.

भांडारकर जातिव्यवस्था कशी उपजली याचा अभ्यास करताना दिसतात, परंतु ते व महाराष्ट्रातले इतर सुधारक त्या व्यवस्थेवर थेट टीका मात्र करत नाहीत. इथे ही सुधारक मंडळी बहुतकरून ब्राह्मण होती हे लक्षणीय आहे.

इतिहासाचा वेगळाच वापर जोतीबा फुल्यांनी केला. ब्राह्मण हे भारताला परके, आर्यवंशीय होते असे त्यांनी मानले; राजवाड्यांसारखेच. यामुळे त्यांनी ब्राह्मण भारताचे प्रतिनिधित्व करतात हे नाकारले. फुले भाषाप्रभू होते, आणि प्रतीक म्हणून व्यक्तींचे आणि विचारांचे महत्त्व जाणत होते. त्यांचा शिवाजीचा पोवाडा संस्कृत शब्द टाळून ब्राह्मणांपासूनची फारकत अधोरेखित करतो आणि शिवाजीला 'गोब्राह्मण प्रतिपालक' किंवा 'क्षत्रिय कुलावतंस' न मानता त्याचे शेतकऱ्यांचा राजा हे रूप ठसवायला ते त्याला 'कुळवाडी भूषण' म्हणतात. पण जोतीबांचा पोवाडा अनैतिहासिक ठरवला गेला.

राजवाड्यांची धर्माचे महत्त्व नाकारणारी सेक्युलर वृत्ती विसरून केवळ मूळ साधने शोधण्याची चिकाटी वाखाणली गेली. इतिहासलेखन, इतिहास-संशोधन हे जास्त जास्त कागदपत्रे शोधणे व टीकाटिप्पणीसह त्यांना प्रकाशित करणे यांतच अडकून बसले.

आता इतिहासलेखनात दोन तट पडले; एक राजवाड्यांच्या अनुयायांचा, जे मुख्य दप्तरापासून सरकारने दूर ठेवले होते त्यांचा आणि दुसरा सरकारमान्य, दप्तरापर्यंत पोचू शकणाऱ्या जदुनाथ सरकार व गो.स. सरदेसायांचा. या दुसऱ्या पक्षाला पूना रेसिडेन्सीचे कागदपत्र दिले गेले, तर भारतीय इतिहाससंशोधन मंडळातले (भाइसंमं) राजवाडेपंथी लोक बाहेरच्या कागदपत्रांपुरते मर्यादित झाले. दोन्हीकडे प्रामुख्याने ब्राह्मणच होते. फुल्यांसारखे मूलभूत वेगळा विचार करणारे दोन्ही पक्षांसाठी गावकुसाबाहेरचेच राहिले.

*(क्रमशः)*

*601, ट्यूलिप, 187, मश्रुवाला मार्ग, शिवाजीनगर, नागपूर-440010.*

ईमेल: vidya_nand@hotmail.com

# गोमांस आणि पाच प्रकरणे

*श्याम पाखरे*

गोमांस, पोर्क, गांधी, सावरकर, जिना

------------------------------------------------------------------

गोमांस ह्या सध्याच्या वादग्रस्त प्रश्नाशी संबंधित इतिहासाची काही महत्त्वाची पाने कोणत्याही टिप्पणीविना उलगडून दाखवत आहेत आधुनिक भारताच्या इतिहासाचे एक तरुण अभ्यासक

------------------------------------------------------------------

**प्रकरण** 1 : 10 डिसेंबर 2015 जागतिक मानवाधिकारदिनी तेलंगणातील ओस्मानिया विद्यापीठाचा परिसर युद्धभूमी बनला होता. निमित्त होते गोमांस विरुद्ध वराहमांस विवाद. गोमांसबंदी व त्यासंदर्भात देशभर होत असलेल्या हल्ल्यांच्या निषेधार्थ डेमोक्रॅटिक कल्चरल फोरम या डाव्या विचारांच्या विद्यार्थीसंघटनेने उच्च न्यायालयाच्या स्थगितीला न जुमानता विद्यापीठपरिसरात गोमांसउत्सव साजरा करण्याचे ठरविले. यास प्रतिक्रिया म्हणून ओ.यु.जॉईंट ॲक्शन कमिटी या दुसऱ्या संघटनेने वराहमांस उत्सवाचे आयोजन करण्याचे जाहीर केले. भाजपाचे आमदार श्री. राजा सिंग यांनी त्यांच्या गौसंरक्षण समितीद्वारे ‘चलो ओस्मानिया’ चा नारा दिला. बजरंग दल व भाजपाच्या काही कार्यकर्त्यांनी विद्यापीठात गौपूजा व यज्ञाचे आयोजन करत असल्याचे जाहीर केले. सकाळपासूनच विद्यापीठाला पोलिस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले. सर्व प्रवेशद्वारांवर बॅरिकेड्स लावण्यात आले. तणाव वाढत गेला. राज्यपरिवहन मंडळाच्या बसेसवर काहींनी दगडफेक केली. पोलिसांनी 330 जणांना ताब्यात घेतले आणि विविध संघटनांचे नियोजित कार्यक्रम उधळून लावण्यांत आले. *(सौजन्य ‘दि हिंदू’ 11/12/2015)*

**प्रकरण** 2 : मोहम्मद अली जिन्ना पाकिस्तान-संकल्पनेचे समर्थक बनवण्याआधीची एक घटना, तेव्हा ते काँग्रेसचे एक राष्ट्रवादी नेते होते आणि बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या निवडणुकीत उभे होते. मतदानाचा दिवस होता. जिन्ना टाऊन हॉल, आताची एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई येथील मतदान केंद्रावर आपले सहकारी एम.सी. छगला यांच्यासोबत उपस्थित होते.

दुपारच्या भोजनावकाशाच्या वेळी साधारणत: 1 वाजता मिसेस जिन्ना त्यांच्या आलीशान लिमोझिनमधून टाऊन हॉलला आल्या. त्यांनी सोबत जिन्नांसाठी जेवणाचा डब्बा आणला होता. डब्यात पोर्क सॅडविचेस होते. जिन्ना पोर्क खात असत. परंतु त्यावेळी पोर्क सॅडविचेस बघताच त्यांचा चेहरा खाडकन उतरला आणि ते वैतागून मिसेस जिन्नांना म्हणाले, "ओह गॉड! तू हे काय केले आहेस? मी निवडणूक हरावे असे तुला वाटते काय? मी मुस्लिम विभक्त मतदार संघातून निवडणूक लढवत आहे, हे तुला कळत नाही काय? जर माझ्या मतदारांना कळले, की मी दुपारच्या जेवणात पोर्क सँडविचेस खात आहे, तर स्वप्नातसुद्धा ही निवडणूक मी जिंकू शकणार नाही". *(पृ.117-118, रोझेस इन डिसेंबर, ऑटोबायोग्राफी, एम.सी.छगला, भारतीय विद्याभवन, बॉम्बे, 1973)*

**प्रकरण 3 :** हिंदुत्वाचे जनक स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकरांनी 1935-36 साली महाराष्ट्रात खळबळ उडवून देणारे गायीवरील निबंध लिहिले. "गाय एक उपयुक्त पशु! माता नव्हे! देवता तर नव्हेच नव्हे!" या निबंधात ते लिहितात, "प्रश्न एका फुटकळ प्रकरणाचा नाही, तर एका सर्वस्पर्शी राष्ट्रीय प्रवृत्तीचा आहे. पोथीनिष्ठ की प्रत्यक्षनिष्ठ, पुरातन की अद्यतन, प्रश्नशून्य विश्वासशील "धर्म" की प्रश्नशील प्रयोगक्षम विज्ञान? ह्या दोन प्रवृत्तींपैकी अद्यतन, प्रत्यक्षनिष्ठ नि प्रयोगसिद्ध विज्ञानच आजच्या परिस्थितीत नि आजच्या जागतिक प्रतिस्पर्धेस आमच्या राष्ट्राचा वेद झाला पाहिजे! आणि ह्या प्रवृत्तीला जर गोपूजा तुमची न पटली तर ती टाकावूच ठरली पाहिजे... एक वेळ राष्ट्रात थोडी गोहत्या झाली तर चालेल, पण उगवत्या राष्ट्राची बुद्धी हत्या होता कामा नये." *( पृ.24-25, क्ष किरणे, वि.दा. सावरकर, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर 2012)*

पुढे ते लिहितात, "........ कोणते मांस खाद्य ते धर्मग्रथांच्या टिपणीत न पाहता वैद्यकाच्या कोष्टकात पाहावे. वैद्यकदृष्ट्या कोणास डुकराचे मांस हितावह असेल, तर त्याला तेच धर्म्य. मनुस्मृतीत वराहाचे मांस खाण्याचा ब्राह्मणांनादेखील जवळजवळ आग्रहच केलेला आहे. जे डुक्कर खात नाहीत त्यांचे म्हणणे असते की, डुक्कर घाण खाते यासाठी ते धर्मत: निषिद्ध मांस! पण गायही घाण खाते। गाय, बैल, म्हैस हे दूध नि शेतीकाम या दृष्टीने मनुष्याच्या अत्यंत उपयोगी माणसाळू असे पाळीव पशू, त्यांना शक्य त्या दयेने पाळावे, पण तरीही ज्या परिस्थितीत त्यांच्यावर दया केल्याने मनुष्याच्या जिवावर बेतते, त्या परिस्थितीत काही ती दया उक्त ठरणार नाही...." *(पृ.131-तत्रैव)*

**प्रकरण 4 :** 13 ऑक्टोबर 1972 रोजी रग्बी युनियन टीम, त्यांचे मित्र, कुटुंबीय आणि सहकारी अशा 45 जणांना घेऊन जाणारे उरुग्वेयन एअर फोर्स लाईट क्र.571 दक्षिण अफ्रिकेतील बर्फाच्छादित अॅन्डीज पर्वतावर कोसळले त्यात 18 जणांचा जागीच मृत्यू झाला. 27 जण बचावले. परंतु ते 11800 फूट उंचीवर जीवघेण्या थंडीत अन्नपाण्यावाचून अडकून पडले. सात दिवसांच्या प्रयत्नानंतर शासनाने शोधमोहीम थांबवल्याचे त्यांना रेडिओवरून कळाले. उपलब्ध अन्नाचा साठा संपला होता. खचून न जाता त्यांनी यातून मार्ग काढण्याचा निर्धार केला आणि सभ्य समाजाला घृणा वाटेल असा एक निर्णय सामूहिकरीत्या घेतला. त्यांनी आपल्या आप्तमित्रांच्या मृत शरीरमांसाचे सेवन केले. त्यांतील दोघांनी 10 दिवसांचा प्रवास करून पर्वत ओलांडला आणि ते जिवंत असल्याची बातमी बाहेरील जगाला कळवली. एकूण 72 दिवसानंतर त्या सर्वांची सुटका करण्यात आली. त्यातील एक डॉ. कॅनेसा हे आज एक प्रख्यात बालरोगतज्ज्ञ आहेत. त्यावेळी ते मेडिकलच्या दुसऱ्या वर्षात शिकणारे 19 वर्षीय तरुण होते. ते त्या क्षणाची आठवण सांगतात, ""मला माझ्या आईची आठवण आली, आणि मला कोणत्याही परिस्थितीत तिला भेटायचे होते. मी माझ्या प्रिय मित्राच्या मृत शरीराचा एक तुकडा उचलला व खाल्ला "जगण्यासाठी". *(मेल ऑन लाईन न्यूज 13/10/2012)*

**प्रकरण 5 :** नवी दिल्ली दिनांक 25 जुलै 1947, गांधीजी प्रार्थनासभेत म्हणतात, “.....भारतामध्ये गोहत्याबंदी करणारा कोणताही कायदा होऊ शकत नाही. मी जाणतो की हिंदूंसाठी गोहत्या निषिद्ध आहे. मी स्वत: अनेक वर्षांपासून गाईची सेवा करण्यास प्रतिबद्ध आहे. परंतु माझा धर्म हा इतरांचाही धर्म कसा होऊ शकेल? तसे करणे म्हणजे हिंदू नसलेल्या इतर भारतीयांवर जबरदस्ती करणे होईल... या देशात फक्त हिंदू राहत नाहीत. येथे मुस्लीम, पारसी, ख्रिश्चन आणि इतर धार्मिक समूह देखील राहतात. हिंदूची अशी धारणा की आता हा फक्त हिंदूचा देश आहे, चुकीची आहे. हा देश येथे राहणाऱ्या सर्वांचा आहे. येथे गोहत्याबंदी कायदा केला तर त्याविरुद्ध पाकिस्तानात घडेल. समजा त्यांनी असे म्हटले की शरीयतच्या विरुद्ध असल्याने हिंदू मंदिरात जाऊन मूर्तिपूजा करू शकत नाहीत, तर? मी दगडातसुद्धा देव पाहतो. परंतु या भावनेच्या आधारे मी इतरांना हानी पोहचवू शकत नाही." (समग्र गांधी वाङ्मय खंड 96)

Email –shyam.pakhare111@gmail.com

# चित्रपट-परीक्षण/ ॲज अग्ली ॲज इट गेट्स

*उत्पल व. बा.*

अग्ली, अनुराग कश्यप

---------------------------------------------------------------------

अनुराग कश्यप ह्या प्रयोगशील दिग्दर्शकाच्या 'निओ-न्वार' शैलीतील नव्या 'सायकॉलॉजिकल थ्रिलर'चे सौंदर्य उलगडून दाखविणारा नव्या पिढीतील एका सिनेरसिकाचा दृष्टीकोन

---------------------------------------------------------------------

माणूस जितका क्लिष्ट त्याहून महानगरातील माणूस थोडा अधिक क्लिष्ट. जगणं पैशाशी बांधलेलं आणि पैशानेच सुटणारं. वाट, आडवाट, पळवाट यांतला फरक इथे धूसर होत जातो आणि नाहीसाही होऊ शकतो. 'अग्ली' या खरोखरीच 'अग्ली'[ चित्रपटाची कथा ही कुठल्याही माणसांची कथा असू शकली तरी ती महानगरातील माणसांची कथा आहे हे जाणवत राहतं.

'अनुराग कश्यपचा चित्रपट' ही काही चित्रपटांची विशेष ओळख आहे. 'अग्ली' हा त्याच यादीतला चित्रपट. डार्क शेड्स उजळपणे दाखवणारा. एका लहान मुलीच्या अपहरणाने कथा सुरू होते आणि ती गुन्हेगाराच्या शोधाच्या दिशेने सरकताना शोध घेणाऱ्यांमधला 'गुन्हेगार' समोर आणते. मुंबईत अभिनेता म्हणून जम बसवण्यासाठी स्ट्रगल करणारा राहुल (राहुल भट) त्याच्या मुलीला - कलीला - गाडीत बसवून त्याचा मित्र आणि कास्टिंग एजंट चैतन्य (विनीत कुमार सिंग) च्या घरी जातो आणि थोड्याच वेळात कली गाडीतून नाहीशी होते. इथून पुढे तिचा शोध वेगळीच रहस्ये उलगडतो, विविध पातळ्यांवर धक्के बसत जातात आणि चित्रपटाची अखेरदेखील सहसा होते

तशी सुखावह होत नाही.

कली जिच्याकडे राहते आहे ती राहुलची घटस्फोटित बायको शालिनी (तेजस्विनी कोल्हापुरे), पोलीसप्रमुख असणारा तिचा मग्रूर नवरा शौमिक बोस (रोनित रॉय) आणि शौमिक व राहुलचे ताणलेले संबंध हा या तपासातील एक महत्त्वाचा कोन. दुसरीकडे अपहरणानंतर चैतन्य आणि राहुल यांचंही बिनसतं. अपहरण ही एक 'संधी' समजून जेव्हा ही पात्रं आपापले स्वार्थ साधायला लागतात किंवा जुने हिशेब चुकते करायला लागतात तेव्हा त्यांच्या बदलत्या रूपाकडे बघताना आपण अवाक् होतो.

'निओ-न्वार' शैलीतील हा 'सायकॉलॉजिकल थ्रिलर' डार्क आणि 'अग्ली' आहेच आणि तो वेगवान, खिळवून ठेवणाराही आहे. सर्व मुख्य पात्रांसोबतच भरपूर भाव खाऊन जाणारी एक भूमिका गिरीश कुलकर्णींच्या वाट्याला आली आहे. इन्स्पेक्टर जाधवच्या भूमिकेत गिरीश कुलकर्णींने कमाल केली आहे. कली हरवल्याची तक्रार घेऊन राहुल आणि चैतन्य दोघे पोलीस स्टेशनमध्ये येतात त्या दीर्घ प्रसंगात गिरीश कुलकर्णी लाजवाब काम करून जातो. हा प्रसंग चित्रपटातील एक हायलाईट आहे. आणि तो बघत असताना क्वेंटिन टारांटिनोची आठवण आल्याशिवाय राहात नाही. विशाल भारद्वाज, अनुराग कश्यप यांच्या प्रसंग चित्रिकरणाच्या शैलीवर बरेचदा टारांटिनोचा प्रभाव आहे की काय असं वाटतं. दीर्घ संवादातून बांधलेले रेंगाळणारे सीन्स, तीव्र भावनिक उद्रेक ही टारांटिनोची खासियत. (पल्प फिक्शन, इनग्लोरियस बास्टर्ड्‌र्स या त्याच्या चित्रपटांमधून अशी बरीच उदाहरणं सापडतात.) हाच परिणाम वरील प्रसंगात साधला गेला आहे. अशा प्रकारच्या प्रसंग-चित्रीकरणाचं वैशिष्ट्य हे की भाषिक अभिव्यक्तीला आणि तपशिलात जायला पुरेपूर मोकळीक मिळते. अर्थात चित्रपटाच्या कथेशी या तपशिलाचं घेणंदेणं असेलच असं नाही, पण अशा दीर्घ संवादातून जे भाष्य ऐकायला मिळतं त्याची रंगत काही और आहे.

अर्थपूर्ण चित्रपटाची, चांगल्या कथेची आवड असणारा प्रेक्षक अशा डार्क चित्रपटाकडे कसा बघत असेल? मला वाटतं की असा एखादा डार्क चित्रपट विजय तेंडुलकरांच्या 'गिधाडे'सारखा असतो. त्यातील उग्रपणा अंगावर येणारा

असला तरी तुम्ही तिकडे बघणं टाळू शकत नाही. दुसरं म्हणजे अनुराग कश्यपने या चित्रपटातला डार्कनेस तसा सुसह्य केला आहे. याचं मुख्य कारण म्हणजे 'गँग्ज ऑफ वासेपूर'सारखं 'रक्तरंजन' इथे नाही. इथे माणसांमधील स्वार्थीपणाचं, संधीसाधूपणाचं दर्शन आहे. थेट हिंसा कमी आहे.

पात्रांची निवड आणि त्यांचा अभिनय हे चित्रपटाचं मुख्य बलस्थान. तेजस्विनी कोल्हापुरेची 'डिप्रेस्ड' शालिनी आणि रोनित रॉयचा कठोर शौमिक दोघेही उत्तम. रोनित रॉयची ही भूमिका त्याच्याच 'उडान'मधल्या भूमिकेची आठवण करून देणारी आहे. गिरीश कुलकर्णीबरोबरच चैतन्यची भूमिका करणारा विनीतकुमार सिंगदेखील लक्षात राहतो. राहुल भटबरोबरच्या एका प्रसंगात त्याने त्याचा भावनिक उद्रेक फारच प्रभावीपणे अभिनीत केला आहे. राहुल भटनेदेखील चांगलं काम केलं आहे. अनुराग कश्यपच्या सर्वच चित्रपटांमध्ये दुय्यम भूमिका करणारे कलाकारदेखील कसून काम करतात. 'अग्ली'देखील त्याला अपवाद नाही. विशेषतः पोलिसांच्या टीममधील चेहरे लक्षात राहतात.

सस्पेन्स थ्रिलरमध्ये 'हू डन इट?' हा कळीचा प्रश्न. पण 'जॉनी गद्दार'सारखा थ्रिलर चित्रपट प्रेक्षकांना माहीत असलेलं रहस्य चित्रपटातल्या व्यक्तींसमोर उलगडत जातो आणि त्या प्रोसेसमध्ये प्रेक्षकांना श्वास रोखून धरायला लावतो. 'अग्ली'मध्ये 'हू डन इट?'चं उत्तर शेवटी मिळतं, मात्र तोपर्यंत उशीर झालेला असतो आणि मुख्य म्हणजे जे उत्तर मिळतं ते 'थ्रिलर' चा अपेक्षाभंग करणारं असतं. पण 'अग्ली'चं वेगळेपण यातच आहे. खरा गुन्हेगार जो असेल तो असेल, पण समोर जे काही चाललंय तेच थ्रिलरमधल्या आणखी एका थ्रिलरसारखं वाटत राहतं आणि आपण त्याच्यातच गुंतत जातो!

अनुराग कश्यपच्या सर्वोत्तम चित्रपटांपैकी एक म्हणून 'अग्ली'ची गणना करता येईल. आणि हिंदीतील एक सर्वोत्तम थ्रिलर म्हणूनही!

ईमेल : utpalvb@gmail.com

# प्रतिसाद

*कुमार नागे*

---

'आसु'मधील दिवाकर मोहनी ह्यांचा 'आमच्या देशाची स्थिती' हा लेख वाचला, आमचे स्नेही प्रमोद सहस्रबुद्धे यांनी या लेखावर मोकळेपणाने चर्चा व्हावी आणि त्याबद्दलची प्रतिक्रिया पाठवावी असे आवाहन केले होते, अनेक वेळेला हा विषय वैचारिक चर्चेपेक्षा भावनिक अंगाने अधिक मांडला जातो म्हणून सर्वप्रथम श्री. मोहनी ह्यांनी केलेल्या 'वैचारिक विवेचनाचे' मन:पूर्वक स्वागत. मी दोन टप्यामध्ये या लेखावर प्रतिक्रिया देऊ इच्छितो; पाहिल्या टप्प्यात लेखातील काही मुद्यांवर माझे मत आणि दुसऱ्या टप्प्यात सद्य परिस्थितीतील व्यवहारातील अनुभव.

जातीच्या उतरंडी वरून असे लक्षात येते की उच्चवर्णीयांनी - शूद्रातिशूद्रांवर जसे अन्याय केले आहेत, तसेच या सर्वांनी मिळून स्त्रियांवर अन्याय केले आहेत, अजून करत आहेत. ब्राह्मणी संस्कृतीतसुद्धा पुरुषप्रधान संस्कृतीचा मिलाफ आहे. प्रत्येक समाजातील स्त्रीवर अन्याय झाला आहे. म्हणून 'मुलीबाळींना त्यांनी शिकविले नाही' यात काही वेगळेपणा नाही. हा मुद्दा सर्व समाजासाठी लागू होईल, फक्त ब्राह्मणवर्गासाठी नाही.

त्या काळात ते काय शिकत होते? आजच्या घडीला 'ते शिक्षण' निरर्थक असेलही. पण तत्कालीन परिस्थितीत तो मान-सन्मानाचा विषय होता. उदा. पूर्वी गावातील पोस्टमन हा आदराचा विषय असे. कारण पत्र-पोचवणे आणि प्रसंगी वाचून दाखवणे हे वेगळेपण त्याच्याकडे होते. आधुनिक जगात मुदलातील 'पोस्ट' ही संस्थाच कालबाह्य होत आहे. राजमान्य बोलीभाषा आणि लिखाण येत असल्यामुळे सत्ताधीशांच्या जवळ राहून 'जागा-जमिनी-स्थावर मालमत्ता' यावर ताबा मिळवणे सोयीचे होते. दिवसभर अंगमेहनत करून जो मोबदला मिळे, त्याचे मूल्य कमी आणि काही तास मंत्रतंत्र म्हणून कोणतेतरी कर्मकांड करून 'दान' स्वरूपात मिळालेले मूल्य जास्त, अशी

तफावत होती. कष्टाला प्रतिष्ठा नव्हती. त्यामुळे श्लोक, वेद इत्यादी (इतरांना न बोलता येणाऱ्या) गोष्टी जर एखादा समाज घटक बोलत असेल तर तो आदरणीय आणि मुख्य म्हणजे समाजमान्यतेचा महत्त्वाचा घटक ठरला होता. कारकुनी, आचारी, पाणक्ये ही उच्चवर्णीयांना उपलब्ध असलेली आणखी काही कमी श्रमाची कामे होती.

'ब्राह्मणेतर समाज अशिक्षित राहिला याला फक्त ब्राह्मण समाज जबाबदार आहे', हे विधान राजकीय सोयीचे सुलभीकरण दर्शविणारे आहे. कष्टकरी, व्यापारी यांनीसुद्धा शिक्षणाला प्राध्यान्यक्रम दिला नव्हता. (त्याची अनेक कारणे आहेत.)कष्टकरी समाजात शिक्षणाचा प्रसार होणे याचा संबंध समाजप्रबोधनापेक्षा 'औद्योगिकीकरणाशी' अधिक आहे. तुम्ही म्हटल्या-प्रमाणे यंत्र सामुग्री नसल्यामुळे किमान उत्पादनासाठी कमाल मानवी श्रम खर्ची घालावे लागत असत आणि शासनकर्ते यांची प्राथमिकता 'महसूल' गोळा करणे ही असल्यामुळे त्यांच्या सोयीनुसार शैक्षणिक साधने उपलब्ध असत.अर्थात अनेक शासनकर्ते हे ब्राह्मणेतर समाजातील होते त्यामुळे तेही तितकेच दोषी म्हणायला हरकत नाही.

परंतु ब्राह्मण वर्गाने हे जाणीवपूर्वक केले होते का? उत्तर 'होय' : कारण प्रत्येक मानवी समूहामध्ये आपल्याच वारसाला/नातेवाईकाना आपल्या जवळचे ज्ञान अथवा संपत्ती देणे ही 'सर्वसाधारणपणे' रीत पद्धत चालत आलेली आहे. लोहार समाजातील किती जणांनी सुतारकाम करणाऱ्यांना 'लोहार काम' शिकवले ? हा प्रश्नही वरील मुद्याला समांतर आहे. कष्टकरी समाज 'शिक्षणापासून' वंचित राहिला त्यासाठी ब्राह्मण समाजाची तत्कालीन मानसिकता हे एक कारण आहे, एकमेव नाही.

**सद्यः परिस्थितीतील व्यवहारातील अनुभव:**

आधुनिक काळात जातपातविरहित अनेक रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत, त्यामुळे 'इतिहासातील' चुकांचे पाढे वाचण्यात फारसे हशील नाही हे ठाऊक असूनदेखील फक्त राजकीय सोयीसाठी हा 'ब्राह्मण–ब्राह्मणेतर' वाद सतत 'जागृत' अवस्थेत ठेवला जातो आणि वैचारिक चर्चेपेक्षा भावनिक चर्चा अधिक होत असते.

काही काळासाठी 'ब्राह्मण–ब्राह्मणेतर' किंवा 'बहुजन-अभिजन' अशी गटवारी करणे सोडून, फक्त मानवी समूह म्हणून आपण वस्तुनिष्ठ अवलोकन केले तर असे लक्षात येते की, 'प्रत्येक जाती-धर्मात बदमाषागणिक असतो एक साधुचरित पुरुषोत्तमही, स्वार्थी राजकारणी असतात जगात, तसे असतात अवघं आयुष्य समर्पित करणारे नेतेही. टपलेले वैरी तसे जपणारे मित्रही! त्यामुळे विशिष्ट जात-जमात चांगली अथवा वाईट असे ठरवणे चुकीचे आहे.

मी स्वतः बहुजनसमाजातील आर्थिक आणि सामाजिक निम्नस्तरीय कुटुंबात जन्मलो. कुटुंबातील आर्थिक आणि वैचरिक दारिद्र्याचा सामना केला पण त्यासाठी ज्यांच्या विचाराची साथ लाभली असे अनेकजण ब्राह्मण कुटुंबात जन्माला आले होते हा त्या व्यक्तींचा दोष म्हणावा का? कारण जगन्मान्य असलेली 'लोकशाही, स्वतंत्र, समता, बंधुता, विवेकी विचारधारा आणि प्रत्यक्ष जीवनात रोटी-बेटीच्या व्यवहारात जाति-धर्माला अजिबात थारा न देणाऱ्या ह्या व्यक्ती फक्त त्यांचा जन्म कुठे झाला आणि आडनाव काय होते यावरून त्यांचे मूल्यमापन करणे 'हा काळावर केलेला' अन्याय असेल. बर त्यातील एकजण (सध्या हयात नाहीत), की ज्यांनी जागतिक पातळीवरील अंधश्रद्धा-निर्मूलनाचे काम केले आहे. दुसरे पन्नाशीच्या आसपास आणि IIT Bombay मधील उच्च विद्याविभूषित आणि खाजगी कंपनीमध्ये संचालक, तिसरा ३० वर्षांचा तरुण एका खासगी कंपनीत उच्चपदस्थ आहे, की जो पुरोहितशाहीचा खरपूस समाचार घेतो, तसं म्हटलं तर बहुजनसमाजाला यांनी दिशाहीन केले पाहिजे पण व्यवहारात यांचे सामाजिक योगदान सकारात्मक आणि नोंद घेण्यासारखे आहे. त्यामुळे हॉटेलमधील मेनूकार्डप्रमाणे आधी उजव्या बाजूला (की, जिथे त्या पदार्थाची किंमत छापलेली असते) बघून माणसाची किंमत ठरू नये .

आगरकर-कर्वे-देशपांडे-लागू ते थेट दाभोलकर असे फक्त नावाच्या उजवीकडे असणारी 'आडनावे' न पाहता आधुनिक मूल्यांच्या कसोटीवर त्या विचारांचा स्वीकार अथवा धिक्कार केला पाहिजे.

ईमेल : kumar_nage@rediffmail.com
भ्रमणध्वनी : ८०९७०४३४२४

# जाफर आणि मी

*वर्जेश सोलंकी*

---

जाफरच्या घरी रमजानचं शरबत प्यालो
त्याच्या निकाहला शाही बिर्याणी

त्याची आई माझ्याच आईसारखी
घरासाठी खपताना चेहऱ्यावरचे छिलके निघालेली

त्याच्या घराच्या भिंती माझ्याच घराच्या भिंताडासारख्या
कुठे कुठे पोपडे निघालेल्या

त्याचे बाबा हळहळतात माझ्याच बाबांसारखं
फाळणीच्या दिवसांबद्दल बोलताना

त्याच्या भाजणीतलं मीठ
माझ्याच घरातल्या डब्यातल्या मिठासारखं
त्याच्या आमटीतलं पाणी एकाच जमिनीतून आलेलं

माझ्या तुळशीवर पडलेला सूर्यप्रकाश
त्याच्या मशिदीच्या आवारातल्या
नीमच्या सळसळीतून मावळलेला

तोहि तिरुपतीला एकदोनदा व देहूला जाऊन आलेला
मीही कितीतरी वेळा खजूर व चादर ओढून आलेलो
पिराच्या दर्ग्यावर बायकोबरोबर

त्याला मला समकालीन वाटत आलेला
गालिब व तुकाराम
आपल्याच जगण्यातलं वाटत राह्यलं

मंटो व भाऊ पाध्येच्या कथेतलं विश्व
दारूच्या नशेतही वंटास बोलली नाही
कि एकमेकांच्या कौमबद्दल कधी अपशब्द

कितीतरी दिवस आतड्यातल्या अल्सरसारखी-
छळत राहिली मला
त्याच्या आईला कॅन्सर झाल्याची बातमी

आम्ही अफवा नव्हतो
आम्ही संप्रदायाची लेबलं नव्हतो

आम्ही होतो दोनवेळच्या दाल चावलची
सोय लावताना चालवलेली तंगडतोड
एकवेळची शांत झोप मिळवण्यासाठी चालवलेला
दिवसभरातला आकांत

काय माहीत मात्र काही दिवसांपासून
कोणीतरी फिरवतंय गल्लीमोहोल्ल्यांतून
जाफर व माझ्यातल्या वेगळेपणाची पत्रकं

* * *

## वर्गणीदारांसाठी निवेदन

'आजचा सुधारक' हे ग्रंथमालेच्या स्वरूपातील विवेकवादाला वाहिलेले विचारपीठ केवळ जनाधारावर चालविले जाते. आम्ही आपल्या विचारांना मुरड घालणारे कोणतेही बंधन स्वीकारत नाही. त्यामुळे वर्गणी हाच आमच्या उत्पन्नाचा मुख्य आधार आहे. गेले जवळजवळ वर्षभर अनिश्चिततेच्या वातावरणामुळे आम्ही अंकासाठी वर्गणी स्वीकारली नव्हती. आता आम्ही नव्या उत्साहाने कामाला लागलो आहोत. हा उत्साह टिकण्यासाठी आपल्या आर्थिक पाठबळाची आम्हाला अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी आपल्या काही सूचना असतील तर त्यांचा आम्ही नक्कीच विचार करू. पण पहिले पाऊल म्हणून आम्ही आपल्याला आपली वार्षिक वर्गणी भरण्याची विनंती करीत आहोत.

**ह्याअंकापासून आम्ही संपूर्ण कॅलेंडर वर्षाचीच वर्गणी घेण्याचे ठरविले आहे. म्हणजे तुम्ही केव्हाही वर्गणीदार बनला तरी तुम्हाला त्या बदल्यात त्या वर्षाचे जानेवारी ते डिसेंबर अंक पाठविलेजातील.**

आजीव वर्गणीदार वगळता अन्य सर्व वर्गणीदारांनी ह्याच महिन्यात एक वर्षाची वर्गणी (व्यक्तींकरता रु.३००/- व संस्थांकरता रु. ३५०/-) पृष्ठ 2 वरील प्रकाशकाच्या पत्त्यावर चेक किंवा मनी ऑर्डरद्वारा पाठवावी. काही तांत्रिक अडचणींमुळे आम्ही RTGS किंवाNEFT द्वारे पैसे स्वीकारू शकत नाही.

# दस्तावेज: स्वामी विवेकानंद ह्यांचे मित्रास पत्र

विवेकानंद, हिंदू धर्म, इस्लाम

---------------------------------------------------------------------------

माझ्या प्रिय मित्रा,

मला तुम्ही पाठवलेले पत्र अतिशय भावले आणि आपल्या मातृभूमीसाठी ईश्वर शांतपणे किती अद्भुत गोष्टी रचतो आहे हे कळल्यामुळे मला अत्यंत आनंद झाला. आपण त्याला वेदान्त म्हणा किंवा अन्य कोणतेही नाव द्या, पण सत्य हे आहे की धर्म आणि चिंतनाच्या क्षेत्रातील अखेरचा शब्द आणि ज्या स्थानावरून आपणास सर्व धर्म व पंथांचे प्रेमाने अवलोकन करता येईल त्याचे नाव आहे अद्वैतवाद. मला विश्वास आहे की भविष्यातील प्रबुद्ध मानवतेचा धर्म हाच असेल. हिब्रू आणि अरबांच्या पूर्वीचा वंश असल्यामुळे हिंदूंना ह्या मुक्कामावर इतरांपूर्वी पोहचण्याचे श्रेय घेता येऊ शकेल; परंतु वास्तवातील अद्वैतवाद, जो सर्व मानवजातीला स्वतःच्या आत्म्याप्रमाणे बघतो व तसा आचारही करतो, सर्व हिंदूंमध्ये कधीही प्रस्थापित झाला नाही.

त्याउलट, माझ्या अनुभवानुसार जर कोणा धर्माला ह्या समतेच्या दिशेने लक्षणीय वाटचाल करता आली असेल, तर तो इस्लाम व केवळ इस्लाम हाच आहे. म्हणून माझा हा दृढ विश्वास आहे की वेदान्तातील तत्त्वे कितीही सूक्ष्म व अद्भुत असली तरी व्यवहारातील इस्लामची जोड मिळाल्याखेरीज ह्या व्यापक मनुष्यजातीच्या दृष्टीने ती पूर्णपणे बिनमोलाची ठरतील. आम्हाला सर्व मानवजातीला अशा मुक्कामावर न्यायचे आहे, जिथे वेद, कुराण, बायबल काहीएक नसेल; पण हे सर्व आम्हाला वेद, कुराण व बायबल ह्यांच्या एकतानतेतून सिद्ध करायचे आहे. मानवजातीला हे शिकवावे लागेल की सर्व धर्म हे अखेरीस त्या 'धर्मा'चे, एकत्त्वाचे विभिन्न आविष्कार आहेत, ज्यांमधून प्रत्येकाला योग्य वाटेल तो मार्ग निवडता येईल.

आपल्या मातृभूसाठी ह्या दोन महान परंपरांचा संगम – वेदान्ताचे मस्तिष्क व इस्लामचे शरीर – हीच एकमेव आशा आहे. सध्याचा गोंधळ व संघर्ष ह्यांवर मात करून वेदान्ताचे शिर व इस्लामची काया ल्यालेला भविष्यातील तेजस्वी व अजिंक्य भारत माझ्या मनात आकार घेत आहे

परमेश्वर तुम्हाला मानवजातीच्या मदतीचे, विशेषतः आपल्या दीन मातृभूमीच्या मदतीचे एक साधन म्हणून घडवो, ह्या प्रार्थनेसह,

सप्रेम तुमचा, विवेकानंद

[Ref : The Complete Works of Swami Vivekananda/ Volume 6/Epistles-II^nd Series/CXLII Friend]